पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

● वर्ष १६ ● अंक ४९ ● मंगळवार, दि. २५ ऑगस्ट २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 ■ Web. https://epaper.citynewssuperfast.com




**सुविचार**

आपली सावली निर्माण करायची असेल तर ऊन सोसायची तयारी असावी लागते

## »थोडक्यात

**आता राज्यातही भाजपने भाकरी फिरवली!**

**मुंबई :** भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनी २०२९ सालच्या लोकसभा निवडणुकीच्या तयारीसाठी राष्ट्रीय पातळीवर भाजप पक्षसंघटनेतील नव्या पदाधिकाऱ्यांची निवड नुकतीच जाहीर केली होती. विधी प्रकोष्ठ प्रभारीपदी भूषण महाडिक, बुद्धिजीवी प्रकोष्ठाचे प्रभारी म्हणून विश्वास पाठक, उद्योग प्रकोष्ठ प्रभारीपदी प्रदेश सह-कोषाध्यक्ष आ. अरुण लखानी, वैद्यकीय प्रकोष्ठ प्रभारी म्हणून डॉ. भारती पवार आणि सहकार प्रकोष्ठ प्रभारीपदी आमदार प्रवीण दरेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

..............

**लाडकी बहिणींसाठी सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवला!**

मुंबई : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेसाठी महायुती सरकारने पुन्हा सामाजिक न्याय विभागाच्या निधी वळवला आहे. या योजनेतील लाभार्थी महिलांना जुलै महिन्याचा हप्ता देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या तरतुदीतून ३४४.७४ कोटी रुपये महिला व बालकल्याण विभागाकडे वळवण्यात आले आहेत. सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवल्यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला. लाडकी बहीण योजना सुरू झाल्यापासून या योजनेसाठी सातत्याने सामाजिक न्याय विभाग तसेच आदिवासी विकास विभागाचा कोटींचा निधी वळवला जात आहे. त्याचा परिणाम या दोन्ही विभागांच्या इतर योजनांवर जाणवू लागला आहे.

**केंद्र सरकारच्या ५४ वेबसाइट्सवर हल्ला!**

**पुणे :** 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान सरकारी वेबसाइट्सवर झालेल्या कथित सायबर हल्ल्याच्या तपासाची व्याप्ती आता पुणे जिल्ह्यातील जुन्नरपर्यंत पोहोचली आहे. जुन्नरमधील तांदूळ बाजार परिसरातील दोन जणांना संशयास्पद 'मनी ट्रान्सफर' व्यवहारांच्या चौकशीसाठी केंद्रीय तपास यंत्रणेने ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, या संदर्भात जुन्नर पोलीस ठाण्यात सध्या कोणताही गुन्हा दाखल नसल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

**CLASSIFIED**

**प्रवेश देणे सुरू आहे**

आय.टी.आय.व १२ वी समकक्ष कोर्सेस

१) इलेक्ट्रीशियन २ वर्ष

(२) बांधकाम पर्यवेशक १ वर्ष प्रवेश पात्रता १० वी, १२ वी पास / नापास, टक्कवारीची अट नाही

डायरेक्ट ऑनलाईन प्रवेश

संपर्क

स्नेहदीप व्होकेशनल

ज्युनिअर कॉलेज, SBI बँकेच्या वरं, राठीनगर, अमरावती

मो. नं.- 8087958087

# दिल्लीसाठी देवेंद्र फडणवीसांची आवराआवर- खा. संजय राऊत

प्रतिनिधी २५ ऑगस्ट



**मुंबई :** नवी दिल्ली येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी राज्यातील महायुती सरकार, भाजप आणि थेट सर्वोच्च न्यायालयाच्या कार्यपद्धतीवर सडकून टीका केली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे लवकरच दिल्लीला रवाना होणार असून, त्याआधी ते राज्यातील प्रलंबित कामे उरकून आपली माणसे महत्त्वाच्या पदांवर बसवण्याची आवराआवर करत असल्याचा मोठा दावा राऊत यांनी केला आहे. यासोबतच नाशिकच्या कुंभमेळ्यातील भ्रष्टाचार, विमानतळांचे खासगीकरण आणि आदिवासींच्या प्रश्नांवरून त्यांनी सरकारला धारेवर धरले. महायुतीच्या बैठकीवर भाष्य करताना राऊत म्हणाले की, गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेले निधीवाटप, राज्यपाल नियुक्त जागा आणि महामंडळांच्या नियुत्तॅया मार्गी लावण्याची लगबग सध्या सुरू आहे. देवेंद्र फडणवीस हे दिल्लीला जाण्याच्या तयारीत असून, त्याआधी ते आवराआवर करत आहेत. दिल्लीला रवाना होण्यापूर्वी आपली माणसे योग्य ठिकाणी बसवून जाण्याची त्यांची खेळी आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न वराळे यांनी कुंभमेळ्यावरील अवाढव्य खर्चावरून केलेल्या विधानाचे राऊत यांनी समर्थन केले. राऊत म्हणाले, 'कुंभमेळ्याचे बजेट ३८,००० कोटींवरून थेट ७५,००० कोटींपर्यंत पोहोचले आहे. मात्र, हा पैसा नाशिकच्या विकासासाठी नाही, तर ठेकेदार आणि मंत्र्यांच्या खिशात जात आहे.' त्यांनी एका गंभीर प्रकरणाचा दाखला देत आरोप केला की, '७२ कोटी रुपयांचे एक कंत्राट मूळ कंपनीने दुसऱ्या कंपनीला ४५ कोटींना दिले आणि त्या कंपनीने तेच काम ३० कोटींना उपकंत्राटदाराला दिले. यातील तब्बल २७ कोटींचे कमिशन एका मंत्र्यांच्या 'चौधरी' नावाच्या जावयाने खाल्ले आहे. या निधीचा १ टक्का जरी शिक्षणावर खर्च झाला असता, तर राज्यातील आश्रमशाळा आणि रुग्णालयांची अवस्था सुधारली असती.'

**शिंदे आणि अजित पवार गटाला राजदूत पदे?**

शिंदे आणि अजित पवार गटावर टीका करताना राऊत म्हणाले की, 'हे पक्ष म्हणजे अमित शहांची 'अंगवस्त्रे' आहेत. त्यांना कोणतेही राज्यपाल पद मिळणार नाही. त्याऐवजी त्यांना ४ देशांचे राजदूत पद दिले जाण्याची शक्यता आहे, कारण त्यांची परदेशातील काळी संपत्ती सांभाळण्यासाठी त्यांना या पदांची गरज आहे.

# अकोल्यात तांदूळ माफियांची चांदी

## »रेशनचा तांदूळ खरेदी-विक्रीचे मोठे रॅकेट
## »पुरवठा विभागाचे संशयास्पद मौन



प्रतिनिधी २५ ऑगस्ट

**अकोला:** गोरगरीब जनतेला जगण्यासाठी शासनाकडून दिले जाणारे रेशनचे धान्य आता माफियांच्या घशात जात असून, अकोला जिल्ह्यात 'तांदूळ माफिया' भलतेच सक्रिय झाले आहेत. शासकीय योजनेअंतर्गत मिळणारा मोफत किंवा स्वस्त दरातील तांदूळ थेट ग्राहकांकडूनच विकत घेऊन त्याची काळ्या बाजारात विल्हेवाट लावणारे मोठे रॅकेट अकोल्यात फोफावले आहे. या साऱ्या प्रकारावर अन्न व नागरी पुरवठा विभाग मात्र डोळ्यांवर पट्टी बांधून बसल्याचे चित्र आहे.

अकोला शहरातील अकोट फाईल, गुलजारपुरा आणि तारफेल या परिसरांमध्ये शासकीय तांदळाची अवैध साठवणूक करणारी गोदामे उघडउघड सुरू आहेत. रेशन दुकानातून धान्य उचलल्यानंतर काही नागरिक हे धान्य स्वतः वापरण्याऐवजी अत्यंत क्षुल्लक दराने या तांदूळ माफियांना विकतात. माफिया हाच तांदूळ गोळा करून मोठ्या गोदामांमध्ये साठवतात आणि नंतर पॉलिश करून किंवा दुसऱ्या गोण्यांमध्ये भरून खुल्या बाजारात व इतर राज्यांत चढ्या भावाने विकतात.शासनाच्या डोळ्यात धूळ फेकून गरिबांच्या अन्नावर दरोडा घालणाऱ्या या माफियांचा पर्दाफाश करून अकोट फाईल, गुलजारपुरा व तारफेल येथील गोदामांवर तात्काळ धाडी टाकाव्यात आणि दोषींवर कठोर गुन्हे दाखल करावेत अशी मागणी समोर येत आहे.

**रेशन कार्ड रद्द होणार का ?**

शासनाच्या योजनेचा हेतू गरिबांची उपासमार थांबवणे हा आहे, धान्य विकून व्यवसाय करणे हा नाही. शासकीय तांदळाची सर्रास विक्री करणाऱ्या अशा बेजबाबदार ग्राहकांवर पुरवठा विभाग कारवाईचा बडगा कधी उभारणार? धान्य काळ्या बाजारात विकणाऱ्या ग्राहकांचे रेशन कार्ड रद्द होणार का? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. शहरातील मध्यवर्ती भागात, दाट लोकवस्तीच्या ठिकाणी शासकीय तांदळाची ही बेकायदेशीर गोदामे कोणाची आहेत? ती कोणाच्या आशीर्वादाने चालवली जात आहेत? दरमहा शेकडो क्विंटल तांदळाची अवैध वाहतूक होत असताना पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना ती कशी दिसत नाही? यावरून पुरवठा विभागाचे अधिकारी आणि तांदूळ माफियांचे घट्ट 'साटेलोटे' असल्याचे स्पष्ट होत आहे.

# अकोला जिल्हा परिषदेच्या कारभाराची होणार पोलखोल

प्रवीण वानखडे २५ ऑगस्ट

**अकोला:** जिल्हा परिषदेतील संशयास्पद कारभार, रखडलेल्या विकासयोजना आणि निधीच्या खर्चातील कथित अनियमिततेची आता थेट विधानमंडळ पातळीवरून चौकशी होणार आहे. राज्य विधिमंडळाची अत्यंत महत्त्वाची आणि धडक कारवाईसाठी ओळखली जाणारी पंचायत राज समिती पुढील महिन्यात अकोला जिल्हा परिषदेवर धडकणार आहे. या समितीच्या दौऱ्याच्या वृत्तामुळे झोपलेल्या प्रशासनात एकच खळबळ उडाली असून, अनेक अधिकारी अन् कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.



गेल्या काही वर्षांत जिल्हा परिषदेच्या विविध विभागांमधील कारभारावर अनेक गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. ग्रामीण भागातील विकासकामांचा निधी कागदावरच खर्च दाखवणे, निविदा प्रक्रियेतील पारदर्शकतेचा अभाव, आणि कॅग अहवालातील गंभीर आक्षेपांची वेळीच तडजोड न करणे, अशा अनेक प्रकरणांचा पाढा आता या समितीसमोर वाचला जाणार आहे. पंचायत राज समिती अकोल्यात दाखल होऊन थेट फाईल्सची 'स्कॅनिंग' करणार असल्याने जि. प. च्या कारभाराची संपूर्ण पोलखोल होणार हे आता निश्चित झाले आहे. पंचायत राज समितीचा हा दौरा केवळ औपचारिक ठरणार नसून, प्रशासनाच्या निष्काळजीपणाची थेट 'चिरफाड' करणारा ठरणार आहे. बांधकाम, शिक्षण, आरोग्य, आणि महिला व बालकल्याण यांसारख्या मोठ्या अर्थसंकल्पीय तरतूद असलेल्या विभागांच्या कामकाजावर समितीची करडी नजर असणार आहे.

**अधिकाऱ्यांची पळापळ; फाईल्सची जुळवाजुळव सुरू**

समितीच्या दौऱ्याची चाहूल लागताच जिल्हा परिषदेच्या वर्तुळात प्रचंड घबराट पसरली आहे. जुन्या नोंदी शोधणे, अपूर्ण फाईल्स पूर्ण करणे आणि प्रलंबित ऑडीट परिच्छेदांची उत्तरे तयार करण्यासाठी सर्वच विभागांमध्ये रात्रीचा दिवस केला जात आहे. अनेक वर्षांपासून धूळ खात पडलेल्या संशयास्पद फाईल्स आता बाहेर काढल्या जात आहेत. ग्रामविकास आणि लोककल्याणाच्या नावाखाली जिल्हा परिषदेत सुरू असलेल्या सुस्त आणि अकार्यक्षम कारभाराला चाप लावण्यासाठी पंचायत राज समितीचा हा दौरा अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. आता या दौऱ्यात कोणते मोठे मासे गळाला लागतात आणि कोणावर कारवाईची कुऱ्हाड कोसळते, याकडे संपूर्ण अकोला जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले आहे.

# महायुतीत एकमेकांवर टीका नको- मुख्यमंत्री फडणवीस

प्रतिनिधी २५ ऑगस्ट

**मुंबई :** महायुतीतील घटक पक्षांमध्ये गेल्या काही दिवसांपासून विविध मुद्द्यांवरून सुरू असलेल्या आरोप-प्रत्यारोपांच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी रात्री महत्त्वाची समन्वय बैठक घेतली. देवेंद्र फडणवीस यांच्या 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी झालेल्या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह महायुतीतील प्रमुख नेते उपस्थित होते. महायुतीतील नेत्यांनी एकमेकांविरोधात सार्वजनिक वक्तव्ये करणे, विसंगत भूमिका मांडणे आणि एकमेकांच्या पक्षांवर टीका करणे टाळावे, अशा स्पष्ट शब्दांत फडणवीस यांनी नेत्यांना सूचना दिल्याची माहिती बैठकीनंतर मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. 'महायुतीची सामूहिक भूमिका जनतेसमोर गेली पाहिजे,' असा बैठकीतील सूर होता. गेल्या काही दिवसांत महायुतीतील घटक पक्षांच्या नेत्यांकडून वेगवेगळ्या मुद्द्यांवर परस्परविरोधी वक्तव्ये करण्यात आली होती.

# संदीप गावंडे यांच्या बंद गोदामातील जुगार अड्ड्यावर धाड

प्रतिनिधी २५ ऑगस्ट

**अकोला:** संदीप गावडे यांच्या बाबुळगाव-गुडदी रोड (गुडदी, अकोला) येथील बंद गोदामावर अकोला स्थानिक गुन्हे शाखेने जुगार अड्डयावर छापा टाकला. ८ आरोपींना अटक, ४.५४ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. संदीप गावंडे कोण असा प्रश्न राजकीय नेत्यांमध्ये चर्चिला जात असून स्टेशन चौकातील राजकीय नेत्यांचे वरदहस्ताने सुरु असलेला क्बल बंद होईल काय अशी विचारणा आता होत आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली बेकायदेशीर धंद्यांविरुद्ध राबवल्या जाणाऱ्या 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. बाबुळगाव-गुडदी




रोडवरील संदीप गावडे यांच्या बंद गोदामामध्ये सुरू असलेल्या जुगार अड्डयावर धाड टाकून पोलिसांनी ८ आरोपींना ताब्यात घेतले आहे. गुप्त माहितीच्या आधारे टाकलेल्या या छाप्यात सुमारे ३ तासांपासून पत्त्यांच्या साहाय्याने जुगार खेळणाऱ्या इसमांवर ही कारवाई करण्यात आली. यात आशिष श्रीकृष्ण कीर्तन, प्रमोद मनोहर नवरखेडे,रोहन गजानन कठाळे, योगेश सुरेश कीर्तन, पंकज कैलास गाढवे , दत्ता पुंडलिकराव ठाकरे. गोपाल जगन्नाथ मदनकार, सागर नंदू विजयकर यांच्याकडील चार दूचाक्या, सहा मोबाईल जप्त करत साडेचार लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी पोलीस स्टेशन बोरगाव मंजू, अकोला येथे जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, नितीन लेव्हलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडली.

## महाराष्ट्र देणार दिल्लीला 840 टन कांदा!

**मुंबई :** देशावर कोणतंही मोठं संकट आलं की महाराष्ट्र पहिल्यांदा धावून जातो. राजधानीवर दिल्लीला आलेल्या प्रत्येक संकटात तर महाराष्ट्र कणा बनून नेहमीच उभा राहिला आहे. त्यामुळेच हिमालयासाठी सह्याद्री धावतो असं म्हटलं जातं. आता दिल्लीत कांद्याचं मोठं संकट उभं ठाकलं आहे. हिमालयाच्या या संकटात पुन्हा एकदा सह्याद्री धावून गेला आहे. महाराष्ट्रातून आज दिल्लीला ८४० टन कांदा पाठवला जाणार आहे. लासलगावहून एक्सप्रेसने हा कांदा जाणार आहे. त्यामुळे दिल्लीतील कांदा टंचाई दूर होण्यसा मदत होणार आहे.

वाढलेल्या कांद्याच्या दारापासून दिल्लीकरांना दिलासा देण्यासाठी २१ व्हेगन असलेली रेल्वे मालगाडी लासलगाव रेल्वे स्थानकात दाखल झाली आहे. आज दुपारी १२ वाजेच्या दरम्यान ट्रकमधून आलेला कांदा रेल्वे मालगाडीत लोडिंगसाठी सुरुवात होईल.

# सिंधी पंचायत निवडणुकीची सोशल मीडियावर धूम !

## व्हॉट्सॲप मेसेज अन् पोस्टर्सने रंगले इलेक्शन

प्रतिनिधी २५ ऑगस्ट



**अकोला:** स्थानिक पूज्य सिंधी जनरल पंचायतीच्या अध्यक्ष (मुखी) पदाच्या निवडणुकीचे वारे अकोल्यात जोरदार वाहू लागले आहेत. या निवडणुकीचा प्रचार आता केवळ प्रत्यक्ष भेटीगाठींपुरता मर्यादित राहिला नसून, सोशल मीडियावर—खासकरून व्हॉट्सॲप, फेसबुक आणि डिजिटल पोस्टर्सद्वारे—प्रचाराची मोठी धूम पाहायला मिळत आहे. उमेदवारांचे 'डिजिटल वॉर' आणि समर्थकांचे व्हॉट्सॲप मेसेज यामुळे या निवडणुकीत कमालीची चुरस निर्माण झाली आहे.

अध्यक्षपदाच्या शर्यतीत तीन प्रमुख दावेदार मैदानात उतरले असून, आपापल्या सामाजिक कामांची पावती देत मतदारांना आकर्षित करण्यासाठी त्यांनी कंबर कसली आहे. यात दौलत चंदवाणी हे व त्यांचा मित्र परिवार सिंधी समाजातील 'सजग प्रहरी' म्हणून प्रचार करत आहे. समाज भयमुक्त व खुशहाल ठेवण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला आहे. वैâन्हय्यालाल रंगवाणी यांचा या पदाचा अनेक वर्षाचा सकारात्मक अनुभव पाठिशी आहे. कैन्हय्यालाल रंगवाणी सामाजिक अनुभव आणि समर्पित नेतृत्वाची शिदोरी घेऊन ते रिंगणात उतरले आहेत.'अनुभव आणि समर्पण हीच आपली ओळख' असा नारा देत त्यांना कौल देण्याचे डिजिटल अपील त्यांच्या टीमकडून केले जात आहे. पूर्व नगरसेवक म्हणून २००२ ते २००७ या काळातील आपल्या कामगिरीचा लेखाजोखा विनोद मनवानी यांनी मांडला आहे. सिंधी कॅम्पमधील टॅक्स कमी करणे, भाजी बाजार दुकानांच्या परवानग्या आणि जकात दरांबाबत व्यापाऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतल्याचा दावा करत, 'आपला विश्वास, माझी जबाबदारी' असा नारा देत ते मतदारांपर्यंत पोहोचत आहेत. प्रचाराच्या या डिजिटल संघर्षात समाजाला जोडणारे सिंधी भाषेतील महत्त्वपूर्ण शब्द आणि संकल्पना केंद्रस्थानी आहेत. रविवार, ३० ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता गायत्री भवन, आदर्श कॉलनी येथे हे मतदान पार पडणार आहे. केवळ पुरुषांना या सर्व प्रक्रियेत मतदानाचा हक्क आहे. ३० तारखेला सिंधी समाज कोणाच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहतो आणि 'मुखिया' पदाचा मुकुट कोणाच्या डोक्यावर सजवतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# तुकाराम मुंढेंच्या धाडसत्राने राज्य हादरले अकोल्यात मात्र 'एफडीए'चे 'दगडाखाली हात'!

## भेसळमाफियांचा अकोल्यात धुमाकूळ; अन्न व औषध प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष?



प्रतिनिधी २५ ऑगस्ट

अकोला: एकीकडे अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या कडक शिस्तीमुळे आणि राज्यभरात धडाधड पडणाऱ्या धाडींमुळे अन्न भेसळ करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. मात्र, अकोला जिल्ह्यात या धाडसत्राचा फुसका बार निघालेला दिसत असून, येथील 'एफडीए' चे अधिकारी सुस्त आणि हातावर घडी घालून बसल्याचे चित्र आहे. राज्यभरात कारवाईचा धडाका सुरू असताना अकोल्यातील अधिकाऱ्यांचे हात मात्र नेमके कोणाच्या 'दगडाखाली' अडकले आहेत, असा संतप्त सवाल आता सामान्य जनता विचारत आहे. अकोल्यातील एमआयडीसी परिसरात अन्नपदार्थ निर्मितीच्या नावाखाली उघडउघड काळेधंदे सुरू आहेत. बनावट खवा, निकृष्ट दर्जाची बनावट मिठाई आणि तळलेल्या खाद्यपदार्थांमध्ये होणारी अत्यंत घातक भेसळ याकडे प्रशासनाने डोळेझाक केली आहे. विनापरवाना आणि कसलेही अन्न सुरक्षा प्रमाणपत्र न घेता सर्रास उत्पादन, विक्री आणि पुरवठा केला जात आहे. हे सगळे अधिकाऱ्यांच्या नाकाखाली सुरू असतानाही 'अन्न विभाग' गाढ झोपेत असल्याचे भासवत आहे.शहर आणि परिसरात गल्लीबोळांत उघडलेली क्लाऊड किचन, बेकरी आणि पार्सल फूड सेंटर्सची नियमित तपासणी कधी झाली, असा प्रश्न पडतो. अकोलेकरांच्या आरोग्याशी खेळणारा सर्वात मोठा विषय म्हणजे दुधाची भेसळ ! आहे. शहरात दैनंदिन विक्री होणाऱ्या सुट्या दुधावर कोणतीही देखरेख नाही. पॅकेटबंद दूध, दही आणि पनीरचे नमुने गोळा करण्यास अधिकारी जाणीवपूर्वक टाळाटाळ का करत आहेत ? असा प्रश्न आहे.

**महापालिकेचीही उघड्यावरील खाद्यपदार्थांवर कृपादृष्टी**

पावसाळ्याचे दिवस सुरू असल्याने दूषित पाण्यामुळे साथीचे आजार पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे. शहरभरात उघड्यावर आणि गटारांच्या शेजारी अस्वच्छ वातावरणात खाद्यपदार्थांची विक्री करणारे शेकडो विक्रेते ठाण मांडून बसले आहेत. मात्र, अकोला महानगरपालिकेचे अतिक्रमण व आरोग्य विभाग यावर कारवाई करण्याचे सौजन्य दाखवत नाही. महापालिका आणि अन्न व औषध प्रशासनाच्या या निष्क्रियतेमुळे अकोलेकरांचे आरोग्य टांगणीला लागले आहे. अकोल्यातील भेसळमाफियांवर तसेच त्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी आता जोर धरत आहे.



# जन्माने ज्यू, लग्न मुस्लीम कुटुंबात अन् प्रेम मराठी भाषेवर!



जन्माने ज्यू, मुस्लिम व्यक्तीशी विवाह आणि भाषा शास्त्रासारख्या विषयाचा अभ्यास यांमुळे अनेकांना त्यांच्याबद्दल कुतूहल होतं. यास्मिन शेख यांच्या वडिलांची नोकरी फिरतीची असली तरी ते नंतर नाशिकला स्थायिक झाले. नाशिकमधल्या त्यांच्या वास्तव्यात त्यांचा परिचय प्रसिद्ध नाटककार वसंत कानेटकरांशी झाला. कानेटकरांमुळेच यास्मिन यांची ओळख तिथल्या चित्रमंदिरात काम करणाऱ्या अझीज अहमद इब्राहिम शेख यांच्याशी झाली. १९५० साली त्यांचा विवाह झाला. निवृत्तीनंतर यास्मिन शेख या पुण्यातील औंध इथे स्थायिक झाल्या होत्या. एकदा महापालिकेचा एक कर्मचारी जनगणना करण्यासाठी त्यांच्या घरी आला. तो विचारत असलेल्या प्रश्नांमध्ये 'तुमची मातृभाषा कोणती?' हा एक प्रश्न होता. 'मराठी' हे शेखबाईंनी दिलेले उत्तर त्याला पटत नव्हते. 'तुमचे आडनाव शेख म्हटल्यावर मातृभाषा उर्दू लिहायला हवी', असा त्याचा आग्रह होता. पण शेखबाईंनी 'मातृभाषा मराठी' अशीच नोंद त्याला करायला लावली. शमा आणि रुकसाना या त्यांच्या दोन्ही मुलींचे शिक्षण मराठी माध्यमातून च झाले आहे.

डॉ. यास्मिन शेख यांनी भाषाशास्त्र आणि व्याकरण या विषयांसाठी अविरतपणे काम केलं. भाषा हा सर्वश्रेष्ठ सांस्कृतिक वारसा आहे. तो जपणे, समृद्ध करणे हे आपले कर्तव्य असल्याचे त्यांनी सातत्याने सांगितले. यास्मिन शेख यांचं मूळ नाव जेरूशा रुबेन. त्या बेनेइस्रायली ज्यू. त्यांचे वडील जॉन रुबेन हे सार्वजनिक बांधकाम विभागात नोकरीला होते. त्यांची नोकरी फिरतीची. त्यामुळे यास्मिन यांचं शिक्षण वेगवेगळ्या गावी झालं. त्यांनी पुण्याच्या स.प. महाविद्यालयातून मराठी भाषा आणि साहित्य या विषयातून पदवी घेतली. श्री.म.माटे हे त्यांचे शिक्षक. माटे सरांच्या उत्तम मराठी शिकवण्याचा, त्यातही मराठी व्याकरण शिकवण्याच्या पद्धतीमुळे यास्मिन या मराठीच्या, मराठी व्याकरणाच्या प्रेमात पडल्या. तिथून पुढे तेच त्यांचं कार्यक्षेत्र बनलं. यास्मिन शेख यांनी औरंगाबादमधील मिलिंद कॉलेज तसंच मुंबईतल्या सायनच्या ए.आय.इ.एस महाविद्यालयात अध्यापन केलं. निवृत्तीनंतर त्यांनी काही वर्षं स्पर्धा परीक्षेच्या मुलांना भाषाशास्त्र व मराठी व्याकरण शिकवलं. त्यांनी 'मराठी लेखन मार्गदर्शिका' व 'मराठी शब्दलेखनकोश' ही मराठी व्याकरणाविषयीची दोन नितांत सुंदर पुस्तकं लिहिली आहेत. अगदी लहानपणीही त्यांना त्यांच्या धार्मिक वेगळेपणाचा अनुभव आला होता. यास्मिन शेख यांच्या वडिलांची फिरतीची नोकरी होती. ते पंढरपूरला होते तेव्हाची गोष्ट...यास्मिन म्हणजेच तेव्हाच्या जेरूशा शाळेत जाताना प्रॉक घालून जायच्या. त्यांचे केस कापलेले होते. इतर मुली मात्र त्यावेळेच्या पद्धतीप्रमाणे परकर-पोलक्यात होत्या. एकदा शनिवारी मुली-मुलींचं ठरलं की, शाळा सुटल्यावर सगळ्यांनी विठ्ठलाला जायचं. 'आम्ही तिथे गेल्यावर ते बडवे बाहेर आले, त्यांनी माझ्याकडे पाहिलं. त्यांना मी वेगळी वाटले. त्यांनी माझ्या बाकीच्या मैत्रिणींना विचारलं की, ही कोण आहे. त्यांनी माझं नाव सांगितलं- जेरुशा रुबेन. नाव ऐकल्यावर त्यांनी 'हिला मंदिर प्रवेश नाही' असं म्हटलं. हे ऐकून मुली चकित होऊन एकमेकींकडे पाहू लागल्या. मग त्या म्हणाल्या की, आम्हीही येत नाही आणि त्याही मंदिरात आल्या नाहीत.' याच मैत्रिणींनी यास्मिन यांना आपल्या घासातला घासही भरवला होता. मुस्लिम व्यक्तीशी विवाह केला असला तरी यास्मिन यांनी मुस्लिम धर्म स्वीकारला नव्हता. कारण त्यांनी नोंदणी पद्धतीने विवाह केला होता. त्यावेळी भिन्न धर्मीय व्यक्तींचं लग्न जेव्हा व्हायचं, तेव्हा रजिस्ट्रार तिथे यायचा आणि सांगायचा की 'आय बिलाँग टू नो रिलिजन' आणि सही करायला सांगायचा. 'मी माझा धर्म सोडलेला नाही. पण लग्नानंतर सासरचे सगळे सणवार केले. पहिल्या वर्षी प्रत्येक सणाला आम्ही पुण्याला जायचो,' अशी आठवण त्यांनी सांगितली होती. यास्मिन शेख यांनी त्यांचं मुस्लिम नाव आणि त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झालेली प्रतिमा याबद्दलचीही एक आठवण सांगितली होती. पहिल्या दिवशी जेव्हा त्या शिकवायला गेल्या, तेव्हा मुलांना वाटलं की, आता बहुतेक बुरख्यातली बाई शिकवायला येणार, ती तुकारामांचे अभंग कसे शिकवणार. त्यामुळे सगळे विद्यार्थी त्यांची थट्टा करायची याच बेताने बसलेले असायचे. 'मी वर्गात जायचे, तेव्हा माझे केस कापलेले. मी पाचवारी साडी नेसलेले असायचे. त्यामुळे मुलं माझ्याकडे चकित होऊन बघायचे आणि मला कळायचं नाही की, एवढं काय चकित होऊन पाहत आहेत. मी शिकवायला लागले की त्यांच्या चेहऱ्यावरचं आश्चर्य हळूहळू नष्ट व्हायचं. मग त्यांना माझं शिकवणं आवडायला लागलं,' असं त्यांनी सांगितलं होतं. प्रत्येक शब्द योग्य जागी, योग्य रूपात आणि योग्य अर्थाने यावा यासाठी आयुष्य वेचणाऱ्या यास्मिन देहरूपाने आपल्यातून २४ ऑगस्ट २०२६ ला निघून गेल्या असल्या, तरी त्यांचा कार्यरूपी वटवृक्ष मराठी भाषेला सदैव सावली देत राहील. या व्याकरणतपस्विनीला भावपूर्ण श्रद्धांजली..!

### यास्मिन शेख यांचा प्रवास थांबला!

» शेखबाई एकदा म्हणाल्या होत्या, 'भाषेला धर्म नसतो, भाषेला जात नसते. मराठी माझी मातृभाषा आहे. माझे माझ्या भाषेवर जिवापाड प्रेम आहे. मराठी भाषा फक्त हिंदूंची नाही; ती महाराष्ट्रात जन्मलेल्या, तेथे वास्तव्य करणाऱ्या सर्वांची भाषा आहे.' भाषेच्या संदर्भात यास्मिन शेख यांची मतं ठाम होती. ललित साहित्यात बोलीभाषा चालू शकते, मात्र निवेदनात आणि वैचारिक लेखनात मात्र प्रमाणभाषाच हवी यावर त्या ठाम होत्या. हे मत त्यांनी वेळोवेळी व्यक्त केलं होतं. एका बोलीभाषेतील लेखनाचे नेमके आकलन दुसरी बोलीभाषा असलेल्या वाचकाला होणार नाही आणि पर्यायाने भाषेच्या क्षेत्रात अनागोंदी माजेल, अशी याबाबतीत त्यांची भूमिका होती. त्याचप्रमाणे व्याकरणाचे नियमही आपण पाळलेच पाहिजेत हाही त्यांचा आग्रह होता. सर्वच शास्त्रांमध्ये त्या-त्या शास्त्राचे नियम असतात आणि आपण ते विनातक्रार पाळतच असतो. इंग्रजी शब्दांचे स्पेलिंगदेखील आपण घोकून घोकून पाठ करत असतो. मग मराठीच्या बाबतीत कंटाळा का करायचा? असा यास्मिन शेख यांचा आग्रह होता. मराठी व्याकरणाविषयी आग्रही असल्या तरी त्या दुराग्रही अजिबात नव्हत्या. बदलत्या काळानुसार त्यात विशेषत: ऱ्हस्व-दीर्घाबाबतच्या नियमांमध्ये बदल करायला हवेत, अशीही त्यांची भूमिका होती.

# श्रावणी सोमवारी का करतात उपवास?



श्रावण महिन्यात कुणी आठवड्यातल्या एखाद्या दिवशी उपवास करतात तर काही जणांचा संपूर्ण महिनाभर उपवास असतो... काही जण खास करून सोमवार पाळतात... पण, हा उपवास का पाळतात? या प्रश्नाचं उत्तर आज आपण जाणून घेणार आहोत...

सोमवार हा शंकराचा वार म्हणून समजला जातो. मग, शंकराला खूश करण्यासाठी सोमवारच्या दिवशी अनेक महिला आणि अविवाहीत मुली उपवास करतात. देवांचा देव म्हणजे महादेव.... श्रावण महिन्यात संपूर्ण भारतात प्रत्येक मंदिरात घरात हर हर महादेव असे स्वर आपल्या कानावर पडतात. श्रावणातल्या प्रत्येक सोमवारी सर्व महादेव मंदिरात महादेवाचे पूजन एका विशिष्ठ पद्धतीने केले जाते. याचे कारण म्हणजे श्रावण महिन्यात शिव आणि पार्वती यांच्या पूजनाचे महत्त्व हिंदू ग्रंथांमध्ये खूप अधिक प्रमाणात वर्णन केले आहे. श्रावण महिन्यातील महादेवाच्या पूजेला खूप फलदायी मानले गेले आहे. याचे एक कारण म्हणजे श्रावण महिन्याला शंकराच्या उपासनेचा महिना असे सांगितले आहे. देवी सतीने तिचे पिता दक्षच्या घरी योगशक्तीने शरीराचा त्याग केला होता. त्याआधी देवी सतीने शंकराला प्रत्येक जन्मात पती स्वरुपात मिळवण्याचा प्रण केला होता. देवी सतीने त्यांच्या दुसऱ्या जन्मात पार्वती असे नाव घेऊन राजा हिमाचल आणि राणी मैना यांच्या घरात मुलीच्या रुपात जन्म घेतला. पार्वतीने श्रावण महिन्यात निराहार राहून कठोर व्रत करून महादेवाला प्रसन्न केले व विवाह केला. त्यानंतर महादेवाला श्रावण महिना विशेष झाला. यामुळेच श्रावण महिन्यात कुमारिका सुयोग्य वर प्राप्तीसाठी व्रत करतात.

# भारतात जेन झी म्हणणे चुकीचे ?



प्रा.डॉ.संजय खडक्कार

जेन झी (जनरेशन झेड) म्हणजे १९९७ ते २०१२ या काळात जन्मलेली मुले. त्यानुसार, २०२६ मध्ये या पिढीतील मुलांचे वय १४ ते २९ वर्षांच्या दरम्यान आहे.जरी जागतिक पातळीवर या पिढीला 'जेन झी' म्हटले जात असले, तरी भारतात ग्रामीण आणि शहरी भागात अजूनही 'तरुण पिढी' किंवा 'आजचा युवक' हेच शब्द सर्वात जास्त लोकप्रिय आहेत.

भारतासारख्या वैविध्यपूर्ण देशात 'जेनझी' हा शब्द वापरणे अनेक कारणांमुळे चुकीचे वाटते.१४ ते २९ वर्षांच्या मुलांना भारतात अधिकृतपणे किंवा समाजशास्त्रीय भाषेत "युवा" (युथ) किंवा "तरुण पिढी" म्हणतात.भारतात सरकारी योजना आणि जनगणनेनुसार या वयोगटाला प्रामुख्याने 'युवा' म्हटले जाते. हिंदी आणि मराठी भाषेत तरुण मुला-मुलींसाठी नवयुवक / नवयुवती हा शब्द मोठ्या प्रमाणावर वापरला जातो. १४ ते १९ वर्षांच्या मुलांना 'किशोरवयीन' (टीनएजर्स) आणि २० ते २९ वर्षांच्या लोकांना 'युवक' (यंग एडल्ट्स) म्हटले जाते. भारतातील १४ ते २९ वयोगटातील सर्वच मुलांचे जीवन सारखे नाही. भारतात ग्रामीण क्षेत्रातील मुलांचे विश्व व शहरी भागातील मुलांचे विश्व पुर्णतः वेगळे आहे. या तरुणांमध्ये खुप मोठी दरी आहे. जेनझी' हा शब्द फक्त शहरी, आधुनिक मुलांपुरताच मर्यादित वाटतो.पाश्चात्य 'जेनझी' पिढीचे विचार आणि कौटुंबिक मूल्ये वेगळी आहेत. भारतात आजही या वयातील मुले कुटुंबाशी, परंपरेशी आणि संस्कृतीशी जोडलेली आहेत. त्यामुळे भारताच्या संदर्भात या पिढीला 'डिजिटल इंडियाची पिढी', 'अमृत काळातील युवा' किंवा थेट 'भारतीय तरुण' म्हणणे अधिक योग्य आणि आदरयुक्त वाटते.

# भारतातील नद्या का आटल्या; प्रदूषित का झाल्या ?

अरविंद कडबे

भारतात जवळपास ब-याच नद्या हिमालयातून उगम पावतात व इतर नद्या या वेगवेगळ्या बर्फ नसलेल्या पर्वतावरून उगम पावतात. हिमालयातून उगम पावणाऱ्या नद्यांना पावसाळ्यात पाणी मिळते व त्याच बरोबर उन्हाळयाच्या कारवधीत बर्फ वितळल्यामुळे पण त्याचे पाणी वाहताना दिसतात.

साधारणतः १९५० च्या काळात भारतातील सर्वच नद्या, नाले, ओढे हे बारमाही वाहत असे. भारतात दरवर्षी पाऊस पडतो. १९५० मध्ये भारताची एकंदर पर्यावरणीय स्थिती बरी होती. त्यामुळे जून-जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर या चार महिन्यात म्हणजेच १२० दिवसात (२८८० तासातील १६८० तास पाऊस होत असे) साधारणतः ७० दिवस पाऊस होत होता.

१९५० पासून आपला प्रवास औद्योगिकरण करण्याकडे व्हायला सुरुवात झाली. तशी ती स्वातंत्र्यपूर्व काळात सुरू झालीच होती. याच कालावधीत १९६० पासून पंजाब, हरियाणा व दक्षिणेत आंध्र प्रदेशात रासायनिक शेती करण्यासाठी सुरुवात झाली. तत्पूर्वी भारतात नैसर्गिक शेती, सेंद्रिय शेती, जैविक शेती भारतात होती. या शेतातील अन्नद्रव्य पदार्थ उत्तम दर्जाचे व सकस होते. त्यामुळे रोगराईचे प्रमाणही कमी होते. भारत यामुळेच जवळपास ३०% निर्यात करणारा देश होता. त्यामुळे समृद्ध होता. रासायनिक शेतीची सुरुवात अशी सुरू इसली आम्हाला भाका नांगल धरण बांधावे लागले व आंधात कावेरीवर धरण बांधावे लागले रासायनिक शेती करायची असेल तर पाणी खूप लागते व हे पाक्षात्यांच्या अनुभवातून आमच्याकडे सुरू

झालेली प्रक्रिया होती, पंजाब-वारियाणा आंध्र प्रदेश या प्रदेशात सुरुवातीला मोठ्या प्रमाणात उत्पादन झाले व १९७२ च्या दुष्काळानंतर एका जिल्हयातून दुसऱ्या जिल्हयात धान्य नेण्यास बंदी होती. मग पंजाब, हरियाणा, आंध्र प्रदेशमधील हरित क्रांतीतून तयार झालेले अन्नधान्य गेले कुठे? भारतातीलच लोकांना त्यावेळेस रेशनच्या दुकानातून लाल गहू मिळायचा जो अमेरिकेतून आणला होता तो आम्ही सर्वांनी अनुभवला. मग हा हरित क्रांतीतून झालेला गहू, तांदूळ व इतर अनधान्य भारतीय समाजाला न मिळता तो नेता कुठे?) मग आपल्याकडे सर्वत्रच (भारतात सर्वत्र) सरकारने सबसिडीने रासायनिक खतं द्यायला सुरुवात केली व संपूर्ण भारत रासायनिक शेती करायला लागला.

जोपर्यंत पारंपरिक शेती (सेंद्रिय शेती, नैसर्गिक शेती) सुरू होती तोपर्यंत भारतातील भूजल स्तर हा खूप वरती होता. त्यामुळे ४ महिन्यात पडलेला पाऊस आठ महिने नदीला ईको फिल्टरमधून पाणी पुरवत असे. कारण की नैसर्गिक शेतीमध्ये जमिनीची इकॉलॉजी ही जिवंत असते. त्यामुळे जो पाऊस पडायचा तो सरळ भूगर्भात जात असे. सर्वत्र भूगभांत, शेत जमिनीतील गांडूळ व मायक्रोऑरगॅनिक्षम है जिवंत होते. जमिनीत भूगर्भ हा वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या स्तरांचा असल्याने संपूर्ण भारतात त्या त्या ठिकाणच्या भूगर्भीय पर्यावरणीय परिस्थितीनुसार वेगवेगळी अन्नधान्य व फळे पुरते मिळत असे व तेच त्या प्रदेशातील समाजाचे अन्न असल्याने रोगराई पण कमी होती. आता रासायनिक शेती केल्याने दुष्परिणाम असा झाला की, एक तर किती प्रमाणात खत टाकायचे याचे प्रशिक्षण अथवा व्यवस्थापन नसल्याने व सबसिडीने मिळत



असल्याने शेतकरी बंधूनी मोठ्या प्रमाणात उपयोग केला.

अनेक जण असे म्हणतात की नद्यांवरती बांध टाकल्यामुळे नदी प्रवाहित नाही. परंतु असे नाही, पावसाळ्यात कुठल्याही शेतांमध्ये पाणी मुरत नसल्याने आज शेतातील मातीसह पाणी मोठ्या केला. परिणाम सुरवातीला चांगला प्रमाणात वाहताना आपण पाहतो.

विहिरी खोदल्या, नद्या आटवल्या. पूर्वी जमिनीत ओलावा असायचा. पण जेव्हापासून रासायनिक शेती सुरू झाली जमिनीचा ओतावा संपला व जर पावसाच्या कालावधीतच गैप पडली तर विहीर बोअरवेलमधील पाणी उपसून आम्हाला ते द्यावे लागते व ते दिले नाही तर अन्नधान्याच्या उत्पादनावर परिणाम होतो. अशा प्रकारे पाणी शेतीला मोठ्या प्रमाणात लागल्यामुळे संपूर्ण भारतात हजारो डॅम बांधण्यात आले. त्याद्वारे पाण्याच्या वितरणासाठी कालवे काढ़ाल्या गेले व यासाठी करोडो अब्तो रुपये हे खर्च करण्यात आले. ज्याच्यापर्यंत कॅनालचे पाणी नाही मिळाले त्यांना मग मागेल त्याला विहिरी बोअरवेल, मागेल त्याला शेततळे हा प्रकार सुरू झाला.

आमचा भूगर्भ हा सर्वात मोठा जलाशय असताना तो पूर्णपणे कोरडा झालेला आहे. जवळपास भारत आज सरासरी २००-३०० फूट जमिनीच्या खालून पाणी उपसतो आहे. अनेक भागात तर १०००-१५०० फुटापासून पाणी उपसणे सुरू आहे. त्याच वेळेस रासायनिक पदार्थ पाण्यामध्ये मिसळल्याने अनेक गावातील, शेतातील, शहरातील पाणी क्षारयुक्त व पंजाब हरियाणाकडील पाणी तर आर्सेनिक युक्त झालेले आहे. जे पिल्याने आज या भागातील लोकांना मोठ्या प्रमाणात कॅन्सर झालेले आहे अशी भीषण परिस्थिती रासायनिक खते व कीटकनाशके वापरल्याने झाली आहे.

सेंद्रिय शेतीने पावसाळ्यात पाण्याचा साठा भूगर्भात सतत मेन्टेन असायचा व शिवाय भूपातळी त्याच्या भागातील आली की जमिनीतील इको फिल्टरमधून पाणी नदीकडे प्रवाहित कामची जे नदीचे इनपुट असायचे, असे इनपुट नदीत्व आज मिळणे दुरापास्त झाले आहे. आज सर्वत्र अनुभवायला येत आहे की आम्ही आज एकाही नदीचे, ओड्याचे, गंगेचे पाणी पिऊ शकत नाही. निसर्ग भारताला पाऊस भरभरून देत आहे हे आमचे भाग्य आहे. पण समाजात एक मानसिकता अशी आहे की आमचे जलाशय (जिधून शहरांना पाणी पुरवठा होतो ते पावसाळ्यात ओव्हर फ्लो झाले म्हणजे पाण्याची समस्या आपली सुटली. आपल्या गावातील नदी, नाले, ओहे हे आज रोजी प्रदूषित झवले आहेत किंवा आटाले आहेत तर ते काम सरकारचे आहे. सरकारला आम्ही कर देतो तेव्हा सरकारने आम्हाला ते सर्व स्वच्छ व सुंदर करून द्यावे.)

१४०-१५० कोटी जनता रोज प्रदूषण करीत आहे. आपण जे प्रदूषण करीत आहोत त्याचाच परिणाम आपल्या नदी, नाले, ओढे प्रदूषित करण्यास कारणीभूत ठरत आहे.

या सर्व परिस्थितीतून जर भविष्यातील नद्या स्वच्छ, सुंदर व प्रत्येक नदीतील पाणी पिण्यायोग्य करायचे असेल तर काही गोष्टींमध्ये बदल करावे लागतील.

१. सेंद्रिय शेती करण्यास सुरुवात केली पाहिजे, प्रथम आपापल्या शेतातील भूजल साठा वाढायला सुरुवात होईल व ८ ते १० वर्षात शेतीच्या इको फिल्टरमधून आपल्या गावातील ओढ्याला, नदीला स्वच्छ पाणी मिळण्यास सुरुवात होईल, कारण सेंद्रिय शेतीला पाणी कमी लागतं.

२) औद्योगिक आस्थापना जे काही पाण्याचे प्रदूषण करीत आहे त्यांना त्यांचे पाणी रिसायकाल करून वापरण्यासाठी सांगितले. झिरो डिस्चार्ज कायदा लागू केला पाहिजे. ३) मोठ्या मोठ्या निवासी संकुलांना पण त्यांचे युज केलेले पाणी रिसायकल करून वापरण्यासाठी कम्पत्तसरी केले पाहिजे त्यांना वेस्ट वॉटर ट्रीटमेंट प्रोजेक्ट उभे करून हे करणे आवश्यक आहे, म्हणजे नदीकडे प्रदूषित पाणी जाणे बंद होईल, ४) सरकारने मोठ्या प्रमाणात सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगर परिषद यांनी त्यांचे एसटीपी (मळ निःसारण केंद्र) सेवेज ट्रीटमेंट पन्टस उभे करून मगच पाणी नाल्यामध्ये सोडले पाहिजे. असे जर त्यांनी नाही केले तर सरकारने त्यांचा पाणी पुरवठा बंद केला पाहिजे. आज भारतात फक्त ५०१% मोठ्या शहरांमध्ये एसटीपी आहेत व रोज नागरीकरण वाढत आहे. सरकारने युद्धपातळीवर एसटीपी प्लॅन्टस उभारले पाहिजे व याकरिता नवीन नवीन टेक्नॉलॉजीचा उपयोग केला पाहिजे, जी टेक्नॉलॉजी वापरत असताना वीज कमीत कमी वापरावी लागेल, कारण भविष्यात विजेचा तुटवडा होणार आहे व नद्या शुद्ध होण्यास मदत होईल. आज सर्वत्र केमिकलचा वापर प्रचंड प्रमाणात वाढला आहे व सोबतच लोकसंख्या पण वाढतच आहे.

गोमाता, भारतमाता व सर्व नद्या या त्रिवेणी संगमानेच भारत परत सुजलाम, सुफलाम व परम वैभवाला जाईल यात शंका नाही, परंतु आज भारतात गौमातेची संख्या खूप कमी झालेली आहे भूमाता आमची रासायनिकयुक्त झालेली आहे एवढे गोमय, गोमूत्र आज आमच्याकडे नाही व आमच्या नद्या आज प्रचंड प्रदूषित झालेल्या आहेत अशा परिस्थितीत आम्हास बायोसॅनिटायझर या नैनो टेक्नॉलॉजीचा उपयोग करूनच भारताला सुजलाम सुफायम करता येईल.

# आपल्या लेखनाने कायम वादग्रस्त राहिलेल्या स्त्रीवादी लेखिका!



तस्लिमा नसरीन या बांगलादेशी - स्वीडिश लेखिका, डॉक्टर, स्त्रीवादी, धर्मनिरपेक्ष मानवतावादी आणि कार्यकर्त्या आहेत. त्या स्त्रीवादावरील लेखनासाठी आणि इस्लामवरील टीकेसाठी ओळखल्या जातात ; त्यांची काही पुस्तके बांगलादेशात प्रतिबंधित आहेत. १९९० च्या दशकाच्या सुरुवातीपर्यंत, स्त्रीवादी विचार असलेले तिचे निबंध आणि कादंबऱ्या, तसेच तिने सर्व 'स्त्रीद्वेषी' धर्म म्हणून संबोधलेल्या गोष्टींवरील टीकेमुळे तिला जागतिक स्तरावर प्रसिद्धी मिळाली. नसरीन १९९४ पासून निर्वासित म्हणून राहत आहे, तिच्या मृत्यूची मागणी करणारे अनेक फतवे जारी करण्यात आले आहेत. युरोप आणि अमेरिकेत एक दशकाहून अधिक काळ राहिल्यानंतर, ती २००४ मध्ये भारतात परतली आणि तेव्हापासून रहिवासी परवाना, मल्टिपल-एंट्री किंवा 'एक्स' व्हिसावर तिथे राहत आहे.

### तस्लिमा नसरीन यांचा आज जन्मदिन

भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) आणि तृणमूल काँग्रेसच्या सरकारांच्या काळात नसरीनला बांगलादेश आणि भारतीय राज्य पश्चिम बंगाल या दोन्हींसह बंगाल प्रदेशातून काळ्या यादीत टाकण्यात आले आणि हद्दपार करण्यात आले. २०२६ मध्ये पश्चिम बंगालच्या राज्य विधानसभेत भारतीय जनता पक्षाच्या विजयानंतर, ती शहरातून जवळपास २० वर्षांच्या वनवासानंतर कोलकाताला परतली.

नसरीनचा जन्म २५ ऑगस्ट १९६२ मध्ये पूर्व पाकिस्तानात, मैमनसिंग येथील डॉ. रजब अली आणि एडुल आरा यांच्या पोटी झाला . तिचे वडील एक फिजिशियन होते आणि मैमनसिंग मेडिकल कॉलेज, तसेच ढाका येथील सर सलीमुल्ला मेडिकल कॉलेज आणि ढाका मेडिकल कॉलेजमध्ये वैद्यकीय न्यायशास्त्राचे प्राध्यापक होते. १९७६ मध्ये हायस्कूल (एसएससी) आणि १९७८ मध्ये कॉलेजमध्ये उच्च माध्यमिक शिक्षण ( एचएससी ) पूर्ण केल्यानंतर, तिने ढाका विद्यापीठाशी संलग्न असलेल्या मैमनसिंग मेडिकल कॉलेजमध्ये वैद्यकशास्त्राचे शिक्षण घेतले आणि १९८४ मध्ये एमबीबीएस पदवीसह पदवीधर झाली. तिचे हिंदू पूर्वज हरधन सरकार हे कायस्थ होत . कॉलेजमध्ये असताना, तिने 'शेंजुती' नावाचे एक काव्य नियतकालिक लिहिले आणि संपादित केले . पदवीनंतर, तिने मैमनसिंग येथील एका कुटुंब नियोजन क्लिनिकमध्ये काम केले, त्यानंतर मिटफोर्ड रुग्णालयाच्या स्त्रीरोग विभागात आणि ढाका मेडिकल कॉलेज रुग्णालयाच्या भूलशास्त्र विभागात काम केले. वैद्यकीय शिक्षण आणि प्रॅक्टिस करत असताना, तिने बलात्कार झालेल्या मुलींना पाहिले; तसेच, बाळ मुलगी झाल्यास प्रसूती कक्षात महिलांना निराशेने आक्रोश करताना ऐकले. मुस्लिम कुटुंबात जन्मलेली , ती कालांतराने नास्तिक झाली. लेखनाच्या ओघात, तिने स्त्रीवादी दृष्टिकोन स्वीकारला.आपल्या साहित्यिक कारकिर्दीच्या सुरुवातीला, नसरीनने प्रामुख्याने कविता लिहिल्या आणि १९८२ ते १९९३ दरम्यान अर्धा डझन कवितासंग्रह प्रकाशित केले, ज्यात अनेकदा महिलांवरील अत्याचार हा विषय होता आणि अनेकदा अत्यंत स्पष्ट भाषा वापरली जात असे. तिने १९८० च्या दशकाच्या उत्तरार्धात गद्य प्रकाशित करण्यास सुरुवात केली आणि तिची माहितीपर कादंबरी 'लज्जा' प्रकाशित होण्यापूर्वी तीन निबंधसंग्रह आणि चार कादंबऱ्या लिहिल्या. इस्लामच्या टीकात्मक परीक्षणासाठी आणि महिलांच्या समानतेच्या मागणीसाठी नसरीनला अनेक शारीरिक आणि इतर हल्ल्यांना सामोरे जावे लागले. तिला फाशी देण्याची मागणी करत लाखो लोक रस्त्यावर उतरले. ऑक्टोबर १९९३ मध्ये, 'काउन्सिल ऑफ इस्लामिक सोल्जर्स' नावाच्या एका कट्टर मूलतत्त्ववादी गटाने तिच्या मृत्यूसाठी बक्षीस जाहीर केले.मे १९९४ मध्ये, 'द स्टेट्समन'च्या कोलकाता आवृत्तीने तिची मुलाखत घेतली , ज्यात तिने कुराणच्या सुधारणेची मागणी केल्याचे म्हटले होते ; तिने दावा केला की तिने फक्त शरिया, म्हणजेच इस्लामिक धार्मिक कायदा , रद्द करण्याची मागणी केली होती. ऑगस्ट १९९४ मध्ये, तिच्यावर 'भडकवणारी विधाने केल्याच्या आरोपाखाली' गुन्हा दाखल करण्यात आला आणि तिला इस्लामिक मूलतत्त्ववाद्यांकडून टीकेला सामोरे जावे लागले. काही लाख निदर्शकांनी तिला ' इस्लामची बदनामी करण्यासाठी साम्राज्यवादी शक्तींनी नियुक्त केलेली धर्मभ्रष्ट व्यक्ती ' म्हटले; एका अतिरेकी गटाच्या सदस्याने तिला फाशी न दिल्यास राजधानीत हजारो विषारी साप सोडण्याची धमकी दिली. दोन महिने लपून राहिल्यानंतर, १९९४ च्या अखेरीस ती स्वीडनला पळून गेली, परिणामी तिने तिचा वैद्यकीय व्यवसाय सोडून दिला आणि पूर्णवेळ लेखिका व कार्यकर्त्या बनली.

१९९४ च्या अखेरीस बांगलादेश सोडून, नसरीन दहा वर्षे पश्चिम युरोप आणि उत्तर अमेरिकेत निर्वासित म्हणून राहिली. तिचा बांग्लादेशी पासपोर्ट रद्द करण्यात आला होता; तिला स्वीडिश सरकारने नागरिकत्व दिले आणि तिने जर्मनीमध्ये आश्रय घेतला. भारताला भेट देण्यासाठी व्हिसा मिळवण्यासाठी तिला सहा वर्षे (१९९४-१९९९) थांबावे लागले, असे म्हटले जाते. १९९८ मध्ये, तिने 'मेयेबेला, माय बंगाली गर्लहुड' हे तिच्या जन्मापासून ते पौगंडावस्थेपर्यंतचे आत्मचरित्रात्मक पुस्तक लिहिले. तिच्या आई-वडिलांना भेटण्यासाठी देशात परतण्याकरिता तिला कधीही बांग्लादेशी पासपोर्ट मिळाला नाही, तिचे आई-वडील दोघेही आता हयात नाहीत.

२००४ मध्ये, तिला भारताकडून नूतनीकरण करण्यायोग्य तात्पुरता रहिवासी परवाना मंजूर करण्यात आला आिण ती पश्चिम बंगाल राज्यातील कोलकाता येथे स्थलांतरित झाली , ज्याचा बांगलादेशसोबत समान वारसा आणि भाषा आहे. २००७ मध्ये, तिला पलायन करण्यास भाग पाडल्यानंतर, एका मुलाखतीत तिने कोलकाताला आपले घर म्हटले. भारत सरकारने तिला भारतीय नागरिकत्व देण्यास नकार दिला असला तरी, देशात नियतकालिक आधारावर राहण्यासाठी तिचा व्हिसा वाढवला. कोलकातामध्ये राहत असताना, नसरीनने आनंदबाजार पत्रिका आणि देश यांसारख्या भारतीय वृत्तपत्रे आणि मासिकांमध्ये नियमितपणे योगदान दिले आणि काही काळ 'द स्टेट्समन'च्या बंगाली आवृत्तीत साप्ताहिक स्तंभ लिहिला.

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती

मंगळवार, दि. २५ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper.citynewssuperfast.com



# दोषींवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यासाठी प्रयत्न करणार - नवनीत राणा

## जिल्हा स्त्री रुग्णालयाची केली पाहणी, नातेवाईकांना दिला धीर

प्रतिनिधी २५ ऑगस्ट

**अमरावती:** रुग्णालयातील प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे ही दुर्दैवी घटना घडली आहे. यातील दोषींवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन कडक कार्यवाही करण्यासंदर्भात तसेच मृत नवजात बालकांच्या कुटुंबीयांना व जखमी नवजात बालकांच्या कुटुंबियांना जास्तीत जास्त आर्थिक मदत देण्यासाठी प्रयत्न करू,असे भाजपा नेत्या तथा माजी खासदार नवनीत रवि राणा यांनी सांगितले. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,आरोग्यमंत्री व पालकमंत्री यांच्याशी दुरध्वनीव्दारे चर्चा केली.

जिल्हा स्त्री रुग्णालयात व्हेंटीलेटरचा स्फोट होऊन या दुदैवी घटनेत ३ नवजात बालकांचा जीव जाऊन ६ नवजात



बालके गंभीर जखमी घटनेची माहिती मिळताच नवनीत रवि राणा यांनी तातडीने रुग्णालयात धाव घेत पाहणी केली. तसेच मृत नवजात बालकांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन करीत धीर दिला. व्हेटीलेंटरचा स्फोट झाल्यानंतर अग्नीशमन यंत्रणा सुरु नव्हती,स्पिनक्लर सुरु नव्हते, अग्नीशामन यंत्रणेचे फायर ऑडीट झाले की नाही याची चौकशी करण्यासंदर्भात संबंधीत अधिकार्‍यांना नवनित राणा यांनी दिले निर्देश दिले.

यावेळी जिल्हाधिकारी आशिष येरेकर, उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, तहसिलदार विजय लोखंडे, जिल्हा शल्य चिकित्सक विनोद पवार व पिडीएमसीचे अधिष्ठाता

### राज्यात अशी घटना पुन्हा घडू नये - आ. रवी राणा

या दुर्दैवी घटनेसंदर्भात मुख्यमंत्री, आरोग्यमंत्री व पालकमंत्र्याशी चर्चा करुन मृत बालकांच्या व जखमी बालकांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याची मागणी आपण करणार आहोत. तसेच महाराष्ट्रात अशी घटना पुन्हा घडू नये, यासंदर्भात दक्षता घेण्याची मागणी सुध्दा करणार असल्याचे आमदार रवि राणा यांनी यावेळी सांगितले.

देशमुख, उपमहापौर सचिन भेंडे यांची उपस्थिती होती. तसेच गटनेते नाना आमले, शिक्षण सभापती अॅड. प्रिती हर्षल रेवणे, मिनी महापौर किशोर जाधव, नगरसेवक सुमती ढोके, नगरसेवक अजय जयस्वाल, नगरसेवक दिपक साहु, नगरसेवक नंदा सावदे, नगरसेवक रजनी डोंगरे, नगरसेवक गौरी मेघवानी, नगरसेवक महेश मुलचंदानी, नगरसेवक योगेश विजयकर, नगरसेवक अर्चना अशोक पांडे, नगरसेवक प्रियंका भुषण पाटणे, नगरसेवक मिराताई कांबळे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष सुनिल खराटे, अवि काळे, भुषण पाटणे, शैलेंद्र मेघवानी, अशोक पांडे, सचिन सोनोने, धनंजय लोणारे, विक्की बिसने, अजय बोबडे, सोपान बोरकर, खुश उपाध्याय, युवराज लबडे, समीर शेंडे, गिरधारी तिवारी यांचीही उपस्थिती होती.

# प्राणघातक हल्ल्यामधील मुख्य विधी संघर्षित बालक ताब्यात

## अमरावती शहर गुन्हे शाखेची कारवाई

प्रतिनिधी २५ ऑगस्ट

**अमरावती:** पोलीस स्टेशन फेजरपुरा येथील दाखल प्राणघातक हल्ल्यामधील मुख्य विधी संघर्षित बालक ताब्यात घेतले आहे.

अमरावती शहर गुन्हे शाखेने ही कारवाई केली. दिनांक १९/०८/२०२६ रोजी पोलीस स्टेशन फेजरपुरा येथे फिर्यादी लता गडींग, वय ५० वर्ष, रा. पंचशील नगर, अमरावती यांनी तक्रार दिली की, फिर्यादी व त्यांचा मुलगा व फिर्यादी यांचा भाचा यांनी रात्री एकत्र जेवण केले व त्यानंतर फिर्यादी यांचा मुलगा व भाचा हे मागील रूम मध्ये झोपले होते. फिर्यादी यांना रात्री साधारण २.३० वा सुमारास मोठमोठ्याने ओरडण्याचा आवाज ऐकु आल्याने फिर्यादी जागी झाले व मुलगा झोपलेल्या रूमकडे गेले असता काही मुले यांनी फिर्यादी यांना धक्का देवून हाता मध्ये चाकु व लाकडी रॅपटर घेवून धावत घराबाहेर पळाले फिर्यादी हे रूम मध्ये गेले असता फिर्यादी यांचा मुलगा व भाचा हे खाली पडलेले दिसुन आले व त्यांच्या अंगावरील कपडे हे रक्ताने भरलेले दिसुन आले त्या मुलांनी फिर्यादी यांच्या मुलाला व भाच्याला पाठी वर पोटावर चाकुने वार करूण जिवे मारण्याच्या उददेशाने हल्ला केला. अशा फिर्यादीचे जबानी रिपार्ट वरून पोलीस स्टेशन फेजरपुरा येथे ७५५/२०२६ कलम १०९ (१), ११८ (२), १८९ (४), १९०, १९१ (३), ३३३ भा. न्या. सं. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाची माहीती गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर यांना मिळताच गुन्हे शाखेच्या पथकासह घटनास्थळी भेट देवुन सदर गुन्हयाची माहती घेवुन गुन्हे शाखेचे दोन पथक तयार करूण आरोपी यांचा शोध घेवुन ताब्यात घेण्याबाबत तत्काळ पथक रवाणा केले होते. सदर गुन्हयाचा संमातर तपास करीत असतांना गुन्हे शाखेच्या पथकास गोपनिय बातमीदारा कडुन माहीती मिळाली की सदरचा गुन्हा हा बेनोडा तसेच फ्रेजरपुरा येथील विधी संघर्षित बालक यांनी केला आहे यावरूण दिनांक २०/०८/२०२६ रोजी बडनेरा रेल्वे स्टेशन पार्कीग मधुन दोन विधी संघर्षित बातक यांना याआधी ताब्यात घेण्यात आले होते. सदर गुन्हयामधील मुख्य विधी संघर्षित बालक हा फरार असल्याने आज दिनांक २४/०८/२०२६ रोजी गुप्त बातमीदारा कडून माहीती मिळाली की सदर विधी संघर्षित बालक हा बेनोडा परिसरा मध्ये आला आहे. वरूण गुन्हे शाखेचे पथक बेनोडा परिसरा मध्ये जावुन शोध घेतला असता सदर विधी संघर्षित बालक हा मिळुण आल्याने त्यास ताब्यात घेवुन पुढिल तपास कामी पोरटे फेजरपुरा यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदर ची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, अमरावती शहर यांचे मार्गदर्शनाखाली,पोलीस उपायुक्त परिमंडळ १ यशवंत सोळंके, पोलीस उपायुक्त परिमंडळ २ श्याम घुगे, पोलीस उपायुक्त मुख्यालय (गुन्हे) प्रांजली सोनवणे यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा युनिट कं २ चे पोलीस निरीक्षक अतुल वर तसेच गुन्हे शाखा युनिट कं १ चे पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वात सपोनि. महेश इंगोले, पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार सुनिल लासुरकर, मंगेश परिमल, मनोज ठोसर, सचिन बहाळे, वाकपांजर, योगेश पवार, राजीक रायलीवाले, चालक संदीप खंडारे, राहुल दुधे, चेतन गुल्हाणे यांनी केली आहे.

# रामपुरी कॅम्प परिसरात प्लास्टिक प्रतिबंधक मोहिम; 5 हजारांचा दंड वसूल

प्रतिनिधी २५ ऑगस्ट

**अमरावती:** अमरावती महानगरपालिकेच्या वतीने रामपुरी कॅम्प परिसरात प्रतिबंधित प्लास्टिकविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले,n अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक व उपायुक्त भाग्यश्री बोरेकर यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली.




वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव, स्वास्थ्य अधीक्षक विजय बुरे तसेच सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले झोन क्र.१ यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने परिसरातील विविध आस्थापनांची तपासणी केली. यावेळी प्रतिबंधित सिंगल यूज प्लास्टिकचा वापर, परिसरातील स्वच्छता तसेच ओला व सुका कचरा वर्गीकरणासाठी दोन डस्टबिनची उपलब्धता याबाबत पाहणी करण्यात आली.

मोहिमेदरम्यान एन. बी. श्रृंगारे यांच्याकडे प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर आढळून आल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून ₹५,००० इतका दंड वसूल करण्यात आला. या मोहिमेत एकूण ₹५,००० दंडाची वसुली झाली. या कारवाईत प्लास्टिक नोडल अधिकारी ए. के. गोहर, ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक राजू ढिक्याव, स्वास्थ्य निरीक्षक सचिन सैनी, निखिल खंगाळे, मेघराज ढेनवाल, इमरान खान आणि रोहित हडाले उपस्थित होते. महानगरपालिकेच्या वतीने प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर टाळण्याचे तसेच शहर स्वच्छ ठेवण्यासाठी नागरिक व व्यावसायिकांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# डफरीन रुग्णालयातील भीषण आगीची महापौरांकडून पाहणी

प्रतिनिधी २५ ऑगस्ट

**अमरावती:** शहरातील जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरीन) येथे लागलेल्या भीषण आगीत तीन नवजात बालकांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. या दुर्दैवी घटनेच्या पार्श्वभूमीवर सोमवार, दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवानी आणि सभागृह नेते चेतन गावंडे यांनी जिल्हा स्त्री रुग्णालयाला भेट देत घटनास्थळाची पाहणी केली.



यावेळी महापौर तेजवानी व सभागृह नेते गावंडे यांनी रुग्णालयातील आग लागलेल्या परिसराची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून घटनेची माहिती घेतली. आगीमुळे झालेली हानी, रुग्णालयातील अग्निसुरक्षा व्यवस्था तसेच आपत्कालीन परिस्थितीत करण्यात आलेल्या उपाययोजनांबाबत त्यांनी माहिती जाणून घेतली.

तीन नवजात बालकांचा मृत्यू झाल्याने या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. भविष्यात अशा प्रकारच्या दुर्घटना टाळण्यासाठी रुग्णालयांमधील अग्निसुरक्षा यंत्रणा सक्षम करणे, आपत्कालीन मार्ग व साधनांची नियमित तपासणी करणे आणि सुरक्षा उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे यावेळी महापौरांनी सांगीतले.

यावेळी महापौर श्रीचंद तेजवानी आणि सभागृह नेता चेतन गावंडे यांनी विभागीय आयुक्त नयना गुंडे तसेच जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्याशी संवाद साधून दुर्घटनेबाबत माहिती घेतली. रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्थेबाबत आवश्यक त्या उपाययोजना करण्यावरही यावेळी चर्चा करण्यात आली.

# संजय गांधी व श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांसाठी हयात प्रमाणपत्र अनिवार्य

प्रतिनिधी २५ ऑगस्ट

**अमरावती** : संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेतील सर्व लाभार्थ्यांसाठी अर्थात हयात प्रमाणपत्र (डिएलसी) सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. अमरावती तहसील कार्यालयाने 18 ते 31 ऑगस्ट या कालावधीत विशेष शिबिर आयोजित केले आहे. सर्व लाभार्थ्यांना विना विलंब हयात प्रमाणपत्र काढून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

शासनाच्या निर्देशानुसार प्रत्येक लाभार्थ्याने बेनिफीशरी सत्यापन ॲपच्या माध्यमातून हयात डिजीटल लाईफ सर्टिफीकेट (डिएलसी) काढून आपण हयात असल्याचे प्रमाणित करणे बंधनकारक करण्यात आले आहे. हे प्रमाणपत्र सादर केल्यास संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ राज्य निवृत्तीवेतन योजनेच्या सर्व लाभार्थ्यांचा शासकीय लाभ सुरु राहील. या अनुषंगाने लाभार्थ्यांच्या सोयीसाठी अमरावती शहर संजय गांधी तहसील कार्यालयामार्फत विशेष शिबिर आयोजित करण्यात आले आहे. सर्व लाभार्थ्यांनी विना विलंब हे प्रमाणपत्र काढावे असे तहसिलदार डॉ. प्रियंका मिसाळ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# राजापेठ पोलीसांनी केला घरफोडीचा गुन्हा उघड

प्रतिनिधी २५ ऑगस्ट

**अमरावती:** राजापेठ पोलीसांना घरफोडीचा गुन्हा उघड करण्यात यश आले आहे.

फिर्यादी रिषभ श्रीकांत खाडे वय २३ वर्ष रा. संस्कार आंनद रेसीडेन्सी फलॅट क. ३०१ तिसरा माळा, नंदनवन कॉलणी अमरावती हे दि. १६.०८.२०२६ रोजी त्यांचे आजीला पाहणेकरीता भोपाळ येथे गेले असता, त्यांनी त्यांचे राहते घरी सीसीटीवी लावले असुन, ते त्यांचे मोबाईल मध्ये सदर घरची फुटेज पाहत असताना त्यांना दि.२०.०८.२०२६ रोजी रात्रीदरम्यान ११.०० वाजता त्यांना त्याचे घराचे सीसीटीवी फुटेज हे बंद आढळुन आले असता त्यांनी सकाळी येउन घराची पाहणी



केली असता, त्यांना त्याचे घरातील लोखंडी कपाटातील २००००० व बेडरुमधील ५०,००० रुपये असे एकुण २,५०,००० रुपये दिसुन आले नाहीं, त्यांना त्याचे घराचे लोखंडी चॅनलचे गेटवे कुलुप कापलेले दिसले अशा प्रकारे कुणीतरी अज्ञात चोराने त्यांचे घरात प्रवेश करुन सदरची रक्कम चोरी करुन नेली आहे असे फिर्यादीचे जबानी रीपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला.

दि. २३.०८.२०२६ रोजी राजापेठ पोलीस स्टेशन वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांचे नेतृत्वात पोलीस स्टेशन राजापेठ चे सपोनि नितीन शिंदे, सपोनी सचिन पवार व डी बी पथकाने सदर गुन्हातील आरोपीतांना ग्राम भानखेडा खुर्द येथुन अटक केली असुन सदरचा गुन्हा उघड केला आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव हर्ष नारायणराव निंब्रर्ते वय २३ वर्ष रा. भानखेडा खुर्द ता. जि. अमरावती धिरज सुभाष जाधव वय २३ वर्ष रा. भानखेडा. खुर्द ता. जि. अमरावती असे आहे. आरोपीतांकडुन जप्त करण्यात आलेला मुददेमाल मध्ये

रोख रक्कम १९०,००० रुपये जप्त करण्यात आली. सदर कार्यवाही ही राकेश ओला पोलीस आयुक्त अमरावती शहर, श्याम घुगे पोलीस उपायुक्त परि.२ अमरावती शहर तसेच संजय खताळे, सहायक पोलीस आयुक्त राजापेठ विभाग अम.श. याचे मार्गदर्शनाखाली पोस्टे राजापेठ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांचे नेतृत्वात पोनि उमेश मुढे (गुन्हे), सपोनी नितीन शिंदे, सपोनी सचिन पवार, पोलीस अंमलदार मनिष करपे, पवन तिवारी, अमोल देशमुख, अर्जुन कदम यांनी केलेली आहे.

# पं. दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्यात 628 उमेदवारांची निवड

प्रतिनिधी २५ ऑगस्ट

**अमरावती** : जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडल करिअर सेंटर अमरावती यांनी 22 ऑगस्ट रोजी परतवाडा येथील कोर्ट रोड स्थित कल्याण मंडपम मध्ये आयोजित केलेल्या पं.दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्यात विविध कंपन्यांनी प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे एकूण 628 उमेदवारांची प्राथमिक निवड केली आहे. या रोजगार मेळाव्यासाठी ऑनलाईन व ऑफलाईन माध्यमातून 806 उमेदवारांनी नोंदणी केली. यातील 777 उमेदवारांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून मुलाखती दिल्या. महिंद्रा अँड महिंद्रा प्रा.ली.नागपूर, जाधव गियर्स ली.अमरावती,वैभव एन्टरप्राईजेस प्रा. लि.नागपूर,जाबील सर्किट इंडिया प्रा. लि. पुणे, नवभारत फर्टिलायझर प्रा. लि. नागपूर, बीव्हीजी पुणे, कोअर प्रोजेक्ट इंजिनियर अमरावती,धूत ट्रान्समिशन प्रा.लि., श्रीराम फायनान्स, ब्लिंकिट,कृपा कन्सल्टनसी पुणे, प्रिसिजन मॅपिंग सोल्युशन अमरावती यांच्याकडून थेट मुलाखती घेण्यात येणार आहे. तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत गट विकास अधिकारी सार्वजनिक बांधकाम विभाग अचलपूर,शासकीय तंत्रनिकेतन अचलपूर आदी 16 कंपन्या व कार्यालयांच्या प्रतिनिधींनी या रोजगार मेळाव्यात सहभागी उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेवून विविध पदांसाठी 628 उमेदवरांची प्राथमिक निवड केली आहे.

# नगर पंचायत गट नेते पंकज मोरे यांनी एसआयसीयू विभागाची केली पाहणी

जयकिसन इंगळे २५ ऑगस्ट

**धरणी** अमरावती जिल्हा महिला रुग्णालयाच्या आयसीयूमध्ये लागलेल्या आगीत तीन नवजात बालकांचा मृत्यू झाला.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर, नगर परिषद गट नेते पंकज मोरे यांनी सोमवारी स्थानिक आयसीयू विभागाची पाहणी केली. पाहणी दरम्यान, पंकज मोरे यांनी नवजात बालकांच्या सुरक्षेबाबत कोणतीही हलगर्जीपणा करू नये, असे आवाहन केले. सर्व आवश्यक उपाययोजना राबवल्या पाहिजेत. आपत्कालीन परिस्थितीत जीवितहानी टाळण्यासाठी अग्निशमन



उपकरणे आणि बचाव यंत्रणा सज्ज ठेवली पाहिजे.वैद्यकीय अधिक्षक डॉ. जावरकर, डॉ. जिराफे व संबंधित अधिकारी व कर्मी उपस्थित होते पंकज मोरे नि अग्निशमन यंत्रणा. फायर सेफ्टी. फायर ऑडीट.सुरक्षा ही प्रत्येकाची प्राथमिक जबाबदारी आहे. याबाबतीत कोणताही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, असा इशाराही पंकज मोरे यांनी दिला.

# आरोग्यदायी समाजाच्या निर्मितीसाठी लोकसहभाग बळकट करण्याचा निर्धार

## जन आरोग्य समितीची सभा उत्साहपूर्ण वातावरणात

प्रतिनिधी २४ ऑगस्ट

**अमरावती:** समाजातील प्रत्येक घटकाला दर्जेदार आणि सुलभ आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासोबतच नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या 'जन आरोग्य समिती'ची सभा आज आयुष्मान आरोग्य मंदिर, हमालपुरा येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. दुपारी २ वाजता झालेल्या या सभेला समितीच्या अध्यक्षा सौ. राधाताई कुरिल यांच्यासह समितीचे सर्व सन्माननीय सदस्य उपस्थित होते.



सभेच्या प्रारंभी जन आरोग्य समितीच्या कार्याचा उद्देश आणि समाजाच्या आरोग्यविषयक गरजा याबाबत चर्चा करण्यात आली. समितीच्या सदस्य सचिव डॉ. मानसी मुरके यांनी उपस्थित सदस्यांना समितीची प्रमुख उद्दिष्टे, धोरणे, कार्यप्रणाली तसेच आरोग्य क्षेत्रातील समितीची भूमिका याबाबत सविस्तर माहिती दिली. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने विविध उपक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी समितीने कोणत्या पद्धतीने कार्य करावे, याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले.

आरोग्यविषयक उपक्रमांना सर्वतोपरी सहकार्याचे आश्वासन

यावेळी जन आरोग्य समितीच्या अध्यक्षा सौ. राधाताई कुरिल यांनी समितीच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या आरोग्यवर्धक उपक्रमांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. समाजाच्या आरोग्याच्या दृष्टीने जन आरोग्य समितीची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, नागरिकांच्या सहभागातून आरोग्यविषयक उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविता येतील, असे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षा राधाताई कुरिल यांच्या सकारात्मक आणि प्रेरणादायी भूमिकेमुळे उपस्थित सदस्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. सार्वजनिक आरोग्याच्या क्षेत्रात सातत्याने आणि एकजुटीने काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

सदस्यांचा सक्रिय सहभाग

सभेत उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांनी आरोग्यविषयक विविध विषयांवर आपले बहुमूल्य विचार मांडले. नागरिकांना आरोग्यसेवा मिळताना येणाऱ्या अडचणी, आरोग्यविषयक जनजागृतीची गरज, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेचे महत्त्व तसेच आरोग्यविषयक विविध उपक्रमांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढविण्याबाबत चर्चा करण्यात आली.

समाजातील प्रत्येक घटकापर्यंत आरोग्यविषयक माहिती आणि सेवा पोहोचविण्यासाठी स्थानिक पातळीवर लोकसहभाग वाढविणे आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. नागरिक, आरोग्य कर्मचारी आणि जन आरोग्य समिती यांच्या समन्वयातून आरोग्यविषयक उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याचा निर्धार आरोग्य प्रोत्साहन आणि दर्जेदार आरोग्यसेवा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे हे जन आरोग्य समितीच्या कार्यातील प्रमुख उद्दिष्ट असल्याचे सभेत स्पष्ट करण्यात आले. यासाठी लोकसहभागाची साखळी अधिक मजबूत करून नागरिकांना आरोग्यविषयक उपक्रमांशी जोडण्यावर भर देण्यात येणार आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
मंगळवार, दि. २५ ऑगस्ट २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## पतंजली ज्येष्ठ नागरिक सेवा संघाची बैठक

वाशिम : आंतरराष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून सोमवार, २४ ऑगष्ट रोजी कोंढाळा रोड येथील गायत्री भवनात पतंजली ज्येष्ठ नागरिक सेवा संघाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले. ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्य, मानसिक आनंद, सामाजिक सहभाग आणि परस्पर सहकार्याबाबत यावेळी सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पतंजली परिवाराचे जिल्हाध्यक्ष तथा योगतज्ज्ञ डॉ. भगवंतराव वानखडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून हृदयरोग तज्ज्ञ डॉ. सुभाष मुसळे, ज्येष्ठ साहित्यिक बाबाराव मुसळे तसेच ब्रह्मकुमारी ओम शांती, वाशिम जिल्हा परिवाराच्या संचालिका स्वाती दीदी उपस्थित होत्या. प्रारंभी सचिव रमाकांत पाटील यांच्यासह कार्यकारिणी सदस्यांनी मान्यवरांचे शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन स्वागत केले. दत्तराव मुसळे यांनी प्रास्ताविक केले, तर प्रकाशराव जाधव यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी मार्गदर्शन करताना उपस्थित मान्यवरांनी पतंजली ज्येष्ठ नागरिक सेवा संघ ही काळाची गरज आहे.

## जमीन व्यवहारात निवृत्त शिक्षकांची फसवणूक ...

# उघडकीस आला एक, प्रकार घडले अनेक !

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

वाशीम शहरात जमीन व मालमत्ता व्यवहारांच्या नावाखाली बनावट कागदपत्रे, खोटी ओळख, बनावट आधार कार्ड आणि संगनमताचा वापर करून नागरिकांची फसवणूक करणारे रॅकेट सक्रिय असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. विशेष म्हणजे, निवृत्त शिक्षक लक्ष्मण प्रल्हाद वानखेडे यांची तब्बल ५५ लाख ५१ हजार रुपयांची फसवणूक झाली असून या व्यवहारात फसवणूक करणाऱ्यावर कारवाई करण्याची तक्रार जिल्हा पोलिस अधीक्षकांकडे करण्यात आली आहे.

निवृत्त शिक्षक लक्ष्मण वानखडे यांच्याकडून जमीन खरेदीच्या व्यवहारात ५५.५१ लाख रुपये घेण्यात आले. मात्र, सदर मालमत्तेच्या पूर्वीच्या व्यवहारात बनावट ओळख व दस्तऐवजांचा वापर करण्यात आला आहे. या प्रकरणात मूळ मालक अश्विनी मोरे यांच्या नावाचा कथित गैरवापर करून बनावट आधार कार्डाच्या माध्यमातून दुसऱ्या महिलेला अश्विनी मोरे म्हणून सादर करण्यात आल्याचा गंभीर आरोप आहे.तक्रारीनुसार, या कथित बनावट व्यवहारानंतर संबंधित प्लॉटचा व्यवहार पुढे करण्यात आला आणि अखेरीस तो निवृत्त शिक्षक गणेश वानखडे यांना विकण्यात आला. त्यामुळे निवृत्तीनंतर आयुष्यभराच्या सेवेतून मिळालेली ५५.५१ लाख रुपयांची रक्कम गमावल्याने वानखडे यांच्यावर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. या प्रकरणात अश्विनी मोरे यांच्या नावाने असलेल्या आधार क्रमांकाचा गैरवापर करून त्यामध्ये हेराफेरी करून कथितरीत्या फोटो व बायोमेट्रिक माहिती बदलण्यात आली का? हा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाला आहे. त्यानंतर या ओळखीचा वापर करून मालमत्तेच्या नोंदणी व्यवहारास हातभार लावण्यात आला असल्याचा आरोप आहे. त्यामुळे संबंधित आधार अपडेट सेंटर, ऑपरेटर, अपडेटची तारीख, बायोमेट्रिक प्रमाणीकरण, फोटो अपडेट, ण्ण्ऊन्फुटेज, ऑपरेटर आयडी तसेच नोंदणी कार्यालयातील संपूर्ण कागदपत्रांची चौकशी करण्याची मागणी करण्यात

### *५५ लाखानी लूटल्याचा प्रकार
### *जिल्हा पोलिस अधीक्षकाकडे तक्रार
### *बनावट दस्ताऐवजाच्या आधारे व्यवहार
### * बनावट महिलेचाच लावला आधार
### * निवृत्त शिक्षक झाला निराधार




आली आहे. टोळीचा प्रमुख अक्षय बंदरेसह संबंधित व्यक्तींच्या भूमिकेची चौकशीची मागणी या प्रकरणात बाळकृष्ण गायकवाड, अनिल चाबुकस्वार, टारझन बढेल, शोभा गजानन सावळे , शुभम सुखदेव राजगुरू, अक्षय गजानन अमरावतकर , आशिष रत्नपारखी, आदेश अनिल वाकुडे, माया पुंडलिक मोरे तसेच इतर संबंधित व्यक्तींची भूमिका तपासण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, शोभा गजानन सावळे हीच अश्विनी मोरे असल्याचे ओळख पटवून देणाऱ्या दोन व्यक्तींचीही भूमिका संशयास्पद असून, ते अक्षय बंदरे याचे जुने परिचित असल्याचा आरोप आहे. या व्यक्तींची चौकशी करून त्यांच्याकडे असलेली माहिती, मोबाईल कॉल रेकॉर्ड, आर्थिक व्यवहार आणि संबंधित काळातील संपर्क तपासण्याची मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणात आणखी एक गंभीर बाब तक्रारीत नमूद करण्यात आली आहे. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, Tata Nexon क्रमांक MH37AH ३१७५ या वाहनाचा वापर तक्रारदाराची आर्थिक स्थिती, त्यांच्याकडे उपलब्ध असलेली निवृत्तीची रक्कम आणि प्लॉट खरेदीची क्षमता याबाबत माहिती मिळविण्यासाठी करण्यात आला असावा, असा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या वाहनाची मालकी, वापर, चालक, संबंधित व्यक्तींशी असलेला संपर्क तसेच उपलब्ध CCTV, FASTag व इतर तांत्रिक पुराव्यांची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

### ठाणेदारांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह

दरम्यान, या प्रकरणात अपेक्षित ती कारवाई होत नसल्याने वाशीम शहर पोलीस निरीक्षक संजय चौधरी यांच्या भूमिकेवरही तक्रारदारांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. आरोपींना संरक्षण दिले जात असल्याचा आरोप करण्यात आला असून, या आरोपांची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, संबंधित आरोपींना संरक्षण देण्यासाठी पोलीस अधिकाऱ्यांनी आर्थिक लाभ घेतल्याची चर्चा असल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. मात्र या आरोपांची स्वतंत्र चौकशी करून सत्यता पडताळणे आवश्यक असल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. आरोप सिद्ध झाल्यास संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर निलंबनासह विभागीय व फौजदारी कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## थोडक्यात

### ७१ जोडप्यांच्या सहभागाने चारभुजा नाथ मंदिरात महारुद्राभिषेक



• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •

श्रावण महिन्याचे पावित्र्य, एकादशीचे धार्मिक महत्त्व आणि भगवान महादेवाच्या आराधनेचा मंगल योग साधत श्री भारत गणेश मंडळ, मंगरूळनाथ यांच्या ७५ वर्षांच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त मंगरूळपीर येथील प्रसिद्ध चारभुजा नाथ मंदिरात भव्य सामूहिक महारुद्राभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या धार्मिक सोहळ्यात तब्बल ७१ विवाहित जोडप्यांनी यजमान म्हणून सहभागी होत पार्थिव शिवलिंग पूजन व महारुद्राभिषेक केला.

वैदिक मंत्रोच्चार, रुद्रपठण, शिवनामाचा जयघोष आणि भक्तिमय वातावरणामुळे चारभुजा नाथ मंदिर परिसर अक्षरशः शिवमय झाला होता. 'हर हर महादेव' आणि 'ॐ नमः शिवाय' च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. या प्रसंगी हरीश बियाणी, प्रकाश जाखोटिया, सागर बाहेती, धनंजय बाहेती, अभिजीत भुतडा, प्रणव जोशी, कृष्णा भुतडा, नयन ओझा, रमण जाखोटिया, लाला शर्मा, अनुज धुत, सोमेश बजाज, आयुष बाहेती, रोहित बाहेती, श्रीधर जोशी, कान्हा बजाज, प्रेम जोशी, विष्णू भंसाली, उज्वल बंग, संजय राठी, गणेश बजाज यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महानायक वसंतरावजी नाईक यांचा स्मृतिदिन साजरा

• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •

मंगरूळपीर येथे हरित क्रांतीचे प्रणेते स्वर्गीय वसंतरावजी नाईक महाराष्ट्र राज्यचे माजी मुख्यमंत्री यांच्या स्मृतिदिनानिमित्त दि. १८/०८/२०२६ रोजी श्री संत श्री संत सेवालाल महाराज संस्थान मंगरूळपीर यांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाचे प्रस्तावना संस्थांचे अध्यक्ष श्री गुलाबराव जाधव सर यांनी केले. वसंतरावजी नाईक यांच्या जीवन पटाला उजाळा प्राचार्य वसंत चव्हाण यांनी दिला. श्री आर जी राठोड गो .सी. जिल्हा संयोजक, डॉ साहेबराव पवार यांनी सुद्धा सखोल मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला शहराचे ज्येष्ठ नागरिक अमरसिंग जाधव माजी खरेदी विक्री संचालक, ज्ञानेश्वर राठोड नायक, शिवचंद चव्हाण तांड्याचे कारभारी, मांगूसिंग चव्हाण मुख्याध्यापक, नागेश राठोड, माणिक चव्हाण सुरेश चव्हाण प्रा रमेश राठोड राठोड ए के पवार प्राचार्य सुपसिंग राठोड हरिश्चंद्र चव्हाण पुजारी राहुल राठोड आय टी राठोड सर भोजने सामाजिक कार्यकर्ते टोपले सर लोलकर पत्रकार शालिक राठोड, विक्रम राठोड, संदीप चव्हाण सर, अनिल चव्हाण रोशन पवार रामेश्वर राठोड कमल टेलर सुनील राठोड,जाधव मिस्त्री रामचंद्र चव्हाण इ घ शेषराव जाधव जगदीश चव्हाण यांच्या उपस्थितीत होते कार्यक्रमाचे आभार श्री धीरज चव्हाण सर यांनी केले. यावेळी समाज बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### प्रा. डॉ. प्रसेनजित चिखलीकर यांना महाराष्ट्र समाजभूषण पुरस्कार

**वाशीम :** युवा कर्तृत्व फाउंडेशन, महाराष्ट्र आणि मानव चेतना जनविकास बहुउद्देशीय सेवा संस्था, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'लक्षवेध कर्तृत्व गौरव संमेलन' अमरावतीच्या वतीने श्री. रामराव सरनाईक समाजकार्य महाविद्यालयातील प्रा. डॉ. प्रसेनजित चिखलीकर यांना त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व लोकाभिमुख कार्याची दखल घेत 'महाराष्ट्र समाजभूषण पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला.

## संत निरंकारी मिशनचे कार्य महान; निरंकारी भवनात १२५ जणांचे रक्तदान

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

संत निरंकारी बाबांनी तीस वर्षांपूर्वी दिलेल्या 'रक्त नाड्यांमध्ये वाहिले पाहिजे, नाल्यांमध्ये नाही' या संदेशानंतर संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या माध्यमातून १९८६ पासून आजतागायत ९ हजारांहून अधिक रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून सुमारे साडेचौदा लाख युनिट रक्त मानवतेसाठी संकलित करण्यात आले आहे.

याच उपक्रमांतर्गत रविवारी (दि. २३) वाशीम शहरातील संत निरंकारी भवन येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात सुमारे १२५ जणांनी रक्तदान केले.या रक्तदान शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे पाटील यांनी संत






निरंकारी मिशनचे मानवतावादी कार्य जगभर सुरू असल्याचे सांगितले. तसेच आजच्या काळात सत्संगाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी माजी आमदार विजयराव जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपनगराध्यक्ष राजुभाऊ भांदुर्गे, मराठी पत्रकार परिषदेचे माजी राज्याध्यक्ष तथा वाशीम जिल्हा पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष माधवराव अंभोरे, श्रीराम महाराज, स्वामी किशन महाराज, विविध सामाजिक व शैक्षणिक संस्थांचे पदाधिकारी, डॉक्टर, शिक्षक आणि समाजसेवक यांची प्रमुख उपस्थिती होती.उद्घाटनपर भाषणात निकेश खाटमोडे पाटील म्हणाले की, जगातील मानवमात्रांचे सर्वांगीण कल्याण करण्यासाठी जाती, पाती, वर्ण, वंश, भाषा, प्रांत आणि धर्म यांच्या नावावर निर्माण झालेल्या भेदभावांचे उच्चाटन करून मानव एकता, विश्वबंधुत्व आणि जागतिक शांतता प्रस्थापित करणे हा संत निरंकारी मिशनचा मुख्य उद्देश आहे. आज समाजात घडणाऱ्या विविध कौटुंबिक घटनांच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक जीवनाबरोबरच कुटुंबातही प्रेम, स्नेह आणि समन्वय टिकवून ठेवणे काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.प्रास्ताविकात माधवराव अंभोरे यांनी सांगितले की, संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनतर्फे १९८६ पासून आजपर्यंत ८,६४४ रक्तदान शिबिरे आयोजित करण्यात आली असून यावर्षीही सुमारे ५०० शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. आतापर्यंत १४,०५,१७७ युनिट रक्त संकलित झाले असून यावर्षीच्या संकलनानंतर हा आकडा साडेचौदा लाखांच्या आसपास पोहोचला आहे. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. सूत्रसंचालन संत साहित्याचे अभ्यासक जनार्दन बोरकर यांनी केले तर आभार प्रदर्शन संतोष खाडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी निरंकारी सेवा दलाच्या बंधू-भगिनींनी परिश्रम घेतले.

संत निरंकारी मंडळाचे सर्व सेवादल महात्मा आणि बहिणजींनी मिळून सुंदर व्यवस्था करण्यामध्ये योगदान दिले व त्याप्रमाणे सर्व तज्ज्ञ टीम डॉक्टर यांनी सुंदर योगदान या ठिकाणी दिले. संपूर्ण रक्तसंकलन हे जिल्हा सामान्य रूग्णालयात वाशीम करण्यात आले.

## यशवंत महाजन यांची युरोपियन प्रीमियर लीगसाठी निवड

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

वाशिमच्या क्रीडा क्षेत्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. वाशिमचे सुपुत्र आणि क्रीडा क्षेत्रातील मेहनती व होतकरू व्यक्तिमत्त्व यशवंत महाजन यांची आगामी युरोपियन प्रीमियर लीग २०२६साठी निवड झाली आहे. विशेष म्हणजे, या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत ते भारताचे माजी क्रिकेटपटू राहुल द्रविड यांच्या मालकीच्या 'डब्लिन गार्डियन्स' संघाच्या टीम सपोर्ट स्टाफ म्हणून जबाबदारी सांभाळणार आहेत.

युरोपियन प्रीमियर लीग २०२६चा क्रिकेट थरार २६ ऑगस्ट ते २१ सप्टेंबर २०२६ या कालावधीत रंगणार आहे. नेदरलँड्स आणि आयर्लंड येथे होणाऱ्या या स्पर्धेत विविध देशांतील नामवंत खेळाडू, प्रशिक्षक आणि क्रीडा क्षेत्रातील तज्ज्ञ सहभागी होणार आहेत.अशा आंतरराष्ट्रीय स्तरावरील



प्रतिष्ठित क्रिकेट स्पर्धेत टीम सपोर्ट स्टाफ म्हणून काम करण्याची संधी यशवंत महाजन यांना मिळणे ही वाशिम जिल्ह्यासाठी निश्चितच अभिमानाची बाब आहे. स्थानिक पातळीवरून आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या व्यासपीठापर्यंत पोहोचत त्यांनी वाशिमच्या क्रीडा क्षेत्राची वेगळी ओळख निर्माण केली आहे.यशवंत महाजन यांच्या या निवडीमुळे वाशिम शहरासह संपूर्ण जिल्ह्यात आनंदाचे वातावरण असून, विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## सिंचन विहिरींच्या अनुदानासाठी...
# शेतकऱ्यांचे अर्धनग्न आंदोलन !

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

मनरेगा अंतर्गत मंजूर झालेल्या सिंचन विहिरींचे बांधकाम पूर्ण करूनही अनुदानाची रक्कम गेल्या दोन वर्षांपासून मिळाली नसल्याच्या निषेधार्थ शेतकऱ्यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवक प्रदेशाध्यक्ष दामुअण्णा इंगोले यांच्या नेतृत्वात अर्धनग्न आंदोलन केले.

वाशिम जिल्ह्यातील तब्बल ८ हजार ४९३ शेतकऱ्यांचे सिंचन विहिरींचे अनुदान दोन वर्षांपासून रखडले असल्याचा आरोप आंदोलक शेतकऱ्यांनी केला. मनरेगा अंतर्गत विहिरी मंजूर झाल्यानंतर शेतकऱ्यांनी



शासनाच्या निकषानुसार विहिरींचे बांधकाम पूर्ण केले. मात्र बांधकाम पूर्ण होऊनही संबंधित शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम मिळालेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले असून, शासनाने तातडीने प्रलंबित अनुदान वितरित करावे, अशी मागणी आंदोलकांनी केली. अनुदानाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात एकत्र येत अर्धनग्न आंदोलन केले. यावेळी शेतकऱ्यांनी घोषणाबाजी करत रखडलेले अनुदान तातडीने देण्याची मागणी केली.

आंदोलनानंतर शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. जिल्ह्यातील प्रलंबित सिंचन विहिरींच्या अनुदानाचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदानाची रक्कम जमा करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

**निधी मिळताच अनुदान जमा करण्याचे आश्वासन**

दरम्यान, आंदोलनाची दखल घेत जिल्हा परिषदेच्या व्हीबी-जी राम जी योजनेच्या गटविकास अधिकारी किरण सांगळे यांनी आंदोलनस्थळी भेट दिली. यावेळी त्यांनी आंदोलक शेतकऱ्यांशी चर्चा करून केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदानाची रक्कम तात्काळ जमा केली जाईल, असे आश्वासन दिले.

## रिसोड पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी;
# १ लाख ५ हजारांचे हरवलेले मोबाईल मालकांना परत !

• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •

### मोबाईल परत मिळताच नागरिकांच्या चेहऱ्यावर उमटला आनंद

रिसोड पोलीस स्टेशनच्या हद्दीतील शहर तसेच ग्रामीण परिसरात हरवलेले व चोरीस गेलेले मोबाईल फोन शोधून काढण्यासाठी रिसोड पोलिसांनी विशेष मोहीम राबविली. तांत्रिक तपासाच्या माध्यमातून पोलिसांनी एकूण ७ मोबाईल फोन शोधून काढण्यात यश मिळविले असून, या मोबाईलची एकूण किंमत सुमारे १ लाख ५ हजार रुपये आहे.नागरिकांनी मोबाईल हरवल्याबाबत तसेच चोरीस गेल्याबाबत पोलीस स्टेशनमध्ये दिलेल्या तक्रारींच्या आधारे पोलिसांनी तांत्रिक तपास सुरू केला.

संबंधित पोर्टलच्या माध्यमातून मोबाईलची माहिती व तांत्रिक बाबींचा तपास करून पोलिसांनी हरविलेले मोबाईल शोधून काढले.मोबाईलचा शोध



लागल्यानंतर संबंधित मालकांशी संपर्क साधण्यात आला. त्यानंतर आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून सर्व ७ मोबाईल त्यांच्या मूळ मालकांच्या ताब्यात सुपूर्द करण्यात आले. दीर्घकाळ हरवलेला मोबाईल पुन्हा मिळाल्याने नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. नागरिकांनी रिसोड पोलिसांचे आभार मानत पोलिसांच्या कार्याचे कौतुक केले. मोबाईल हरवल्यास किंवा चोरीस गेल्यास नागरिकांनी विलंब न करता जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील (भा.पो.से.), अपर पोलीस अधीक्षक लता फड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी, वाशिम रामकृष्ण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली रिसोड पोलीस स्टेशनचे ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.या पथकात पोलीस उपनिरीक्षक सागर भारस्कर, पोलीस अंमलदार रवि इरतकर, पोलीस कॉन्स्टेबल विनोद घनवट, पोलीस कॉन्स्टेबल रवि अढागळे आणि पोलीस कॉन्स्टेबल परमेश्वर भोने यांचा सहभाग होता.

## अनोळखी माणूस गलो गल्ली भटकताना दिसल्यास पोलिसांना संपर्क करा - गोपाल वर्मा

• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •

मंगरूळनाथ शहरात गेल्या काही दिवसां पासून चोरीच्या घटनांबाबत नागरिकांमध्ये चिंता वाढली असून भवित अवस्था असल्याने नागरिकांनी सतर्क राहणे गरजेचे असून अनोळखी व्यक्ती गलो गली भटकताना दिसल्यास पोलिसांना संपर्क करावा कारण काही नवीन व्यक्ती शहरातील गल्ली-बोळांमध्ये फिरताना व घरांची पाहणी करताना दिसून येत असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आले आहे.



त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता सावध व सतर्क राहावे. संशयास्पद व्यक्ती किंवा हालचाल आढळल्यास स्वतःहून कोणतीही कारवाई करू नये. शक्य असल्यास सुरक्षित अंतरावरून माहिती नोंदवून तात्काळ पोलिसांना कळवावे.या संदर्भातील माहिती मंगरूळनाथ पोलीस स्टेशनच्या ठाणेदार साहेबां पर्यंत पोहोचवण्यात आली आहे. अनोळखी व्यक्तींना घराची माहिती देऊ नका. संशयास्पद हालचाल दिसल्यास पोलिसांना कळवा. आपल्या शेजाऱ्यांनाही सतर्क करा. अफवा न पसरवता अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवा. सावधानता हीच सुरक्षितता. मंगरूळनाथकरांनी सतर्क राहा. काही अनुचित प्रकार घडण्याची शक्यता असल्या स तात्काळ आपल्या परिसरातील नागरिकांना सावध राहण्याचा इशारा करा अशी महत्त्वाची सूचना गोपाल वर्मा भाजपा युवामोर्चा जिल्हा संघटन महामंत्री यांनी केली आहे.

# तरुणाई फाउंडेशनला सार्थक सेवा सन्मान पुरस्कार



प्रतिनिधी २५ ऑगस्ट

**खामगाव :** गेल्या २५ वर्षांपासून बुलढाणा जिल्ह्यात सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तरुणाई फाउंडेशन, खामगाव या संस्थेला पुणे येथे आयोजित कार्यक्रमात च्सार्थक सेवा सन्मानज् पुरस्काराने गौरविण्यात आले. पुणे येथील सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत सार्थक फाउंडेशनच्या वतीने रविवार, दि. २३ ऑगस्ट रोजी या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. पुण्यातील प्रसिद्ध उद्योजक व फ्लीट गार्ड कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. निरंजन किर्लोस्कर आणि श्री रामकृष्ण चॅरिटेबल ट्रस्टच्या प्रमुख पूनम ताई किर्लोस्कर यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी सार्थक फाउंडेशनच्या मॅनेजिंग डायरेक्टर स्वाती ताई नामजोशी तसेच प्रसिद्ध चार्टर्ड अकाउंटंट प्रदीप नामजोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

महाराष्ट्रातील तब्बल ७५ संस्थांमधून तरुणाई फाउंडेशनची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. रोख रक्कम व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. तरुणाई फाउंडेशनचे अध्यक्ष नारायण पिठोरे यांच्या नेतृत्वाखाली सचिव राजेंद्र कोल्हे, उपाध्यक्ष सौ. सुचिता श्यामकुमार उमाळे आणि मंजितसिंग शिख यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी संस्थेचे विश्वस्त व सहसचिव रमेश बोराडे, अमोल तायडे, ज्योतीताई धंदर, ज्योतीताई कोल्हे, सूरज अकोलेकर, अमोल मुंजे, अंतरिक्ष इंगळे, रसिका कोल्हे, प्रणंजय कांडेकर, प्रांजल गव्हांदे, जान्हवी कोल्हे यांच्यासह संस्थेचे सदस्य उपस्थित होते. दरम्यान, तरुणाई फाउंडेशनच्या वतीने कार्यक्रमातील मान्यवरांचे सालईबन प्रकल्पातील रानभाज्या, विविध पदार्थ, सेंद्रिय धान्य तसेच वृक्षबीज देऊन अनोख्या पद्धतीने स्वागत करण्यात आले. या उपक्रमाचे पुणेकरांनी विशेष कौतुक केले. तरुणाई फाउंडेशनच्या सामाजिक व पर्यावरणीय कार्याची दखल आता राज्यभर घेतली जात असून, च्सार्थक सेवा सन्मानज् पुरस्कारामुळे संस्थेच्या कार्याला आणखी एक मानाचा गौरव प्राप्त झाला आहे.

# मृत शेतकऱ्यांच्या वारसांनाही कर्जमाफीचा मार्ग मोकळा

## आधार प्रमाणीकरणासाठी शासनाची विशेष कार्यपद्धती

प्रतिनिधी २५ ऑगस्ट

**खामगाव :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळण्यासाठी आधार प्रमाणीकरण आवश्यक आहे; मात्र मृत शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण शक्य नसल्याने त्यांच्या वारसांसाठी शासनाने विशेष कार्यपद्धती निश्चित केली आहे.

त्यामुळे पात्र मृत कर्जदारांच्या वारसांना आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून कर्जमाफीचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मृत लाभार्थ्याच्या वारसाने संबंधित बँकेकडे मृत्यू प्रमाणपत्र आणि वारसाची नोंद असलेली आवश्यक माहिती सादर करावी. बँकेने कर्जखात्यात वारसाची नोंद केल्यानंतर योजनेच्या पोर्टलवरील 'अपलोड डीसिज्ड अकाउंट्स' सुविधेद्वारे संबंधित माहिती अपलोड करावी. त्यानंतर महाआयटीकडून अपलोड केलेल्या कर्जखात्यांची योजनेच्या निकषांनुसार छाननी केली जाईल. या प्रक्रियेनंतर पात्र वारसांना आधार प्रमाणीकरण करावे लागणार आहे.

आधार प्रमाणीकरणापूर्वी किंवा त्यावेळी संबंधित वारसांकडे शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) असणे आवश्यक आहे. मृत कर्जदारास एकापेक्षा अधिक



वारस असल्यास योजनेच्या निकषांनुसार कर्जरकमेतील प्रत्येक वारसाचा हिस्सा निश्चित करून त्यानुसार कर्जमाफीची रक्कम वर्ग केली जाणार आहे. त्यामुळे मृत कर्जदारांच्या पात्र वारसांना शासनाने निश्चित केलेली प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर योजनेअंतर्गत कर्ज माफी चा लाभ मिळणार आहे. मृत कर्जदाराच्या कर्जखात्यावर वारसांची नोंद अधिकृतपणे होणे हा कर्जमाफीच्या पुढील प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा राहणार आहे. त्यामुळे संबंधित वारसांनी बँकेकडे आवश्यक कागदपत्रे सादर करून कर्जखात्यातील नोंदी अद्ययावत करून घेणे आवश्यक आहे.

**अचूकतेला महत्त्व !**

योजनेच्या प्रक्रियेत बँकेमार्फत सादर होणाऱ्या माहितीच्या अचूकतेला महत्त्व राहणार आहे. वारसांचे नाव, कर्जखात्याशी संबंधित तपशील आणि इतर आवश्यक माहितीमध्ये तफावत असल्यास प्रक्रिया प्रभावित होऊ शकते. त्यामुळे नोंदी तपासून घेणे आवश्यक ठरणार आहे.

**प्रत्येक वारसाची स्वतंत्र पात्रता तपासणी!**

मृत कर्जदाराच्या सर्व वारसांना कर्जमाफीचा लाभ आपोआप मिळणार नाही. संबंधित वारसांची योजनेतील पात्रता स्वतंत्रपणे तपासली जाणार आहे. शासनाच्या निकषांमध्ये पात्र ठरणाऱ्या वारसांनाच कर्जमाफीचा लाभमिळणार आहे.

**कर्जमाफीच्या रकमेचे वाटप नियमानुसार!**

एकापेक्षा अधिक वारस असलेल्या प्रकरणात कर्जमाफीच्या रकमेचे वाटप शासनाने निश्चित केलेल्या निकषांनुसार केले जाणार आहे. त्यामुळे वारसांमधील हिस्सेवारीनुसार संबंधितांच्या पात्रतेचा विचार करून कर्जमाफीची रक्कम निश्चित केली जाईल

# बर्डे प्लॉटमध्ये किरकोळ कारणावरून मारहाण; विट डोक्यात मारुन जरवमी

प्रतिनिधी २५ ऑगस्ट

खामगाव: बड़े प्लॉट परिसरात किरकोळ कारणावरून झालेल्या बादात एका व्यक्तीच्या डोक्यात बीट मारून जखमी केल्याची घटना २३ ऑगस्ट रोजी रात्री घडली. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अलीम खान उस्मान खान (५०) हे घराजवळ असताना त्यांची पाच वर्षीय नात अनाया ही शेख साबीर शेख बुढन यांच्या मुलांसोबत खेळत होती. पुन्हा भांडण होऊ नये म्हणून अलीम खान यांनी नातीला रागाबत घरात बोलावत असताना आरोपी शेख साबीर शेख बुढन याने त्यांच्याशी वाद घालत शिवीगाळ केली. यावेळी आरोपीची पत्नी उजमा बी हिला पतीला समजावण्यास सांगितले असता तिनेही फिर्यादीसोबत वाद घातला. त्यानंतर शेख साबीर याने रस्त्यावर पडलेली वीट अलीम खान यांच्या डोक्यात मारल्याने ते जखमी झाले. या हल्ल्यात त्यांच्या डोक्यातून रक्तस्राव झाला. तसेच आरोपीने जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीने तक्रारीत नमूद केले आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८ (१), ३५२ व ३५१(२) नुसार शेख साबीर शेख बुढन आणि उजमा बी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास हेड कॉन्स्टेबल विजय उभे करीत आहेत

# खामगाव विधानसभा मतदारसंघात एसआयआर प्रक्रियेचा पहिला टप्पा पूर्ण

## २,७५,५३३ मतदारांचे गणना प्रपत्र डिजिटायझेशन पूर्ण; १८,४४८ मतदारांची गणना प्रपत्रे प्राप्त नाहीत

प्रतिनिधी २५ ऑगस्ट

**खामगाव :** मा. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यातील मतदार याद्यांची विशेष सखोल पडताळणी प्रक्रिया (स्ढ्क्र) दि. २९ जून २०२६ पासून सुरू करण्यात आली होती. या प्रक्रियेचा पहिला टप्पा दि.

१७ ऑगस्ट २०२६ रोजी पूर्ण झाला आहे. २६ खामगाव विधानसभा मतदारसंघात एकूण २,९३,९८१ मतदार असून, त्यापैकी २,७५,५३३ मतदारांचे गणना प्रपत्र प्राप्त करून, स्वाक्षरीसह डिजिटायझेशनची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. तर १८,४४८ मतदारांचे गणना प्रपत्र प्राप्त झालेले नाही. स्ढ्क्र प्रक्रियेअंतर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (क्चरुह्) यांनी मतदारांच्या घरोघरी भेटी देऊन गणना प्रपत्र प्राप्त करून घेणे, त्यावर स्वाक्षरी घेणे तसेच प्राप्त प्रपत्रांचे डिजिटायझेशन करण्याची कार्यवाही केली. या संपूर्ण प्रक्रियेसाठी मतदार नोंदणी अधिकारी, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, क्चरुह्, पर्यवेक्षक तसेच इतर प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी यांची यंत्रणा कार्यरत होती. गणना प्रपत्र प्राप्त न झालेल्या १८,४४८ मतदारांमध्ये मयत मतदार ४,९७९, स्थलांतरित ९,८६४, दुबार नोंदणी २,३९८, अनुपस्थित १,१९१ आणि इतर कारणांमुळे १६ मतदारांचा समावेश आहे. गणना प्रपत्र प्राप्त न झालेल्या मतदारांची यादी संबंधित राजकीय पक्षांचे प्रतिनिधी (क्चरूर) यांना उपलब्ध करून देण्यात आली. तसेच या संदर्भात दि. १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत आवश्यक बैठका घेऊन त्यांचे इतिवृत्त क्चरुह् ॲपवर अपलोड करण्यात आले आहे. दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध होणार स्ढ्क्र प्रक्रियेनंतर दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानंतर प्रक्रियेनुसार ३,७३९ मतदारांना तसेच विसंगती असलेल्या (रङ्गशद्वङ्घ4 1शह्लद्भह्म्ह्य) ६,१७० मतदारांना नोटीस बजावण्यात येणार आहे. संबंधित मतदारांनी नोटीसमध्ये नमूद केलेल्या तारखेस आवश्यक कागदपत्रांसह संबंधित सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांच्यासमोर सुनावणीस उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच दि. १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकावर पात्र ठरणाऱ्या १८ वर्षे पूर्ण केलेल्या नागरिकांची नवीन मतदार म्हणून नोंदणी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर सुरू करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर पात्र नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह आपल्या संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (क्चरुह्) यांच्याशी संपर्क साधावा.

तसेच सन २००२ च्या मतदार यादीतील नोंदणीबाबत उपलब्ध असलेली आवश्यक माहिती व पुरावे संबंधित क्चरुह् ांच्याकडे सादर करावेत, असे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी डॉ. रामेश्वर पुरी यांनी केले आहे.

# मुलांच्या खेळण्यावरून वाद; मजुराला मारहाण, दोघांवर गुन्हा

प्रतिनिधी २५ ऑगस्ट

**खामगाव :** शहरातील बर्डे प्लॉट परिसरात मुलांच्या खेळण्यावरून झालेल्या वादातून एका ५० वर्षीय मजुराला शिवीगाळ करून मारहाण करून जखमी केल्याची घटना २३ ऑगस्ट रोजी रात्री घडली. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अलीम खान उस्मान खान (५०, रा. बर्डे प्लॉट, खामगाव) हे २३ ऑगस्ट रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास घरी होते.

**मारहाणीत मजूर जखमी**

त्यांची पाच वर्षीय नात बाहेर शेख साबीर शेख बुढन यांच्या दोन मुलांसोबत खेळत होती. पुन्हा भांडण होऊ नये म्हणून अलीम खान यांनी नातीला रागावत घरात बोलावले. यावेळी शेख साबीर तेथे आला आणि अलीम खान यांना शिवीगाळ करू लागला. अलीम खान यांनी आरोपीची पत्नी उजमा बी हिला पतीला समजावून सांगण्यास सांगितले; मात्र त्यानंतर वाद वाढला. फिर्यादीनुसार, शेख साबीर याने रस्त्यावर पडलेली वीट उचलून अलीम खान यांच्या डोक्यात मारली, तसेच आरोपीने धमकी दिल्याचेही फिर्यादीत नमूद आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी दोघांविरोधात गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

# घाटपुरीत तरुणावर हल्ला; लोखंडी रॉडने डोक्यात मारल्याने जखमी

प्रतिनिधी २५ ऑगस्ट

**खामगाव :** घाट्पुरी येथील वॉटर। फिल्टरजवळील हॉटेलमध्ये जेवणासाठी थांबलेल्या तरुणाला धक्काबुक्की करून मारहाण केल्याची घटना १९ ऑगस्ट रोजी रात्री घडली. यावेळी दगड फेकून मारल्याने तसेच लोखंडी रॉडने डोक्यात प्रहार केल्याने तरुण जखमी झाला. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी दोघांसह इतर अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी मोतीलाल रामभाऊ शिंगणे (६७) रा. पेठपुरा, पिंपळगाव राजा यांचा मुलगा १९ ऑगस्ट रोजी रात्री घाटपुरी येथील वॉटर फिल्टरजवळील हॉटेल प्राप्ती येथे जेवणासाठी थांबला होता. त्यावेळी महेंद्र पद्माकर दामोधर (३०) आणि शिवप्रतापसिंग रामकरणसिंग ठाकूर (३५), दोघेही रा. जळका भडंग, ता. खामगाव, यांच्यासह इतर अनोळखी पुरुष तेथे आले. आरोपींनी फिर्यादीच्या मुलाला धक्काबुक्की करून मारहाण केली. त्यानंतर त्याच्यावर दगड फेकून मारल्याने तो जखमी झाला. याचवेळी एका अनोळखी व्यक्तीने हातातील लोखंडी रॉडने मागून त्याच्या डोक्यात प्रहार केला. या हल्ल्यात तरुणाच्या डोक्याला दुखापत झाली. फिर्यादीच्या तोंडी तक्रारीवरून शिवाजीनगर पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(१) व ३(५) नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल दिनेश घुगे करीत आहेत

# बॉक्सिंग प्रशिक्षण केंद्राची अल्पावधीतच दमदार कामगिरी

प्रतिनिधी २५ ऑगस्ट

**खामगाव :** खामगाव येथे सुरू असलेल्या खुल्या बॉक्सिंग प्रशिक्षण शिबिरातील प्रशिक्षणार्थीनी जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत घवघवीत यश संपादन करून प्रशिक्षण केंद्राची दमदार वाटचाल अधोरेखित केली आहे. शेगाव येथे २३ ऑगस्ट रोजी बुलढाणा जिल्हा बॉक्सिंग असोसिएशनच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत खामगावच्या खेळाडूंनी अनेक सुवर्ण व रौप्यपदकांची कमाई केली. श्रीमती सु. रा. मोहता महिला महाविद्यालय, श्री अ.खी.

नॅशनल हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज तसेच बुलढाणा जिल्हा बॉक्सिंग असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने नॅशनल हायस्कूलच्या प्रांगणात हे खुले बॉक्सिंग प्रशिक्षण शिबिर सुरू आहे. या स्पर्धेत महिला महाविद्यालयाची कु. निशा उमेश गवई हिने ६५ किलो बजन गटात सुवर्णपदक पटकावले. नॅशनल हायस्कूलचा यश समाधान बावस्कर यानेही सुवर्णपदक मिळविले. कु. चारुकेशी चंद्रशेखर मंडोले हिने रौप्यपदक, तर कु. तनिष्का कौर मनदीपसिंग चव्हाण, राघव संतोष मेहसरे, हर्षल सिसोदिया, अन्वय अमर कस्तुरे, आरुष बेतकर, मयंक नरवाडे आणि प्रज्वल विनोद शेळके यांनी सुवर्णपदक पटकावले. शिवदीप संदीप देशमुख याने रौप्यपदक मिळविले. प्रशिक्षणार्थींच्या मेहनतीसोबतच नॅशनल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष व पदाधिकारी, प्राचार्य प्रा. हेमा जवंजाळ, प्राचार्य नंदा उदापूरकर, आयोजक प्रा. डॉ. सीमा देशमुख तसेच प्रशिक्षक संकेत धार्मदे व यश पाटील यांच्या मार्गदर्शनामुळे हे यश मिळाल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.

# मरीमाता मंदीरासमोर दारु पिऊन दांगडो करणाऱ्या विरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी २५ ऑगस्ट

**मलकापुर :** 'उमाळी येथील मरीमाता मंदिरासमोर दारूच्या नशेत धामधूम करणाऱ्या विजय वासुदेव निंबोळकर (वय ३३) रा.उमाळी याच्याविरुध्द मलकापूर ग्रामीण पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल केला. २३ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७.१५ वाजता आरोपी विजय वासुदेव निंबोळकर हा उमाळी येथील मरीमाता मंदिरासमोर दारुचे नशेत धामधुम करतांना मिळून आला. वैद्यकीय तपासणीतही त्याने मद्यसेवन केले असून तो मद्याच्या अंमलाखाली असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी नमूद केले. याप्रकरणी पोलीस अंमलदार सुभाष सरकटे यांच्या फिर्यादीवरून कलम ८५(१) महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास बीट अंमलदार सुभाष सरकटे करीत आहेत.

# मोलकरणीनेच लंपास केला सव्वा लाखांचा ऐवज

**नांदुरा :** डागा ऑइल मिल परिसरात राहणाऱ्या एका कुटुंबाच्या घरातील कपाटातून ४५ हजार रुपये रोख व १५ ग्रॅम वजनाची सोन्याची पोथ, असा सुमारे १ लाख २० हजार रुपयांचा ऐवज मोलकरणीने लंपास केल्याची घटना १५ जुलै रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास घडली. याप्रकरणी २२ ऑगस्ट रोजी नांदुरा पोलिसांनी मोलकरणीविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

डागा ऑइल मिल परिसरातील रहिवासी रेणू राकेश डागा यांच्या जेठाचे निधन झाल्याने धार्मिक विधी सुरू होते. त्यामुळे डागा कुटुंबातील सदस्यांचे घराबाहेर येणे-जाणे सुरू होते. या काळात त्यांनी घरातील कपाटात ४५ हजार रुपये रोख आणि १५ ग्रॅम वजनाची तुळशी माळेच्या मण्यांची सोन्याची पोथ, अंदाजे ७५ हजार रुपये किमतीची, ठेवली होती. काही दिवसांनी कपाट तपासले असता रोख रक्कम व सोन्याची पोथ गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. कुटुंबीयांनी घरातील व्यक्ती तसेच मोलकरणीकडे चौकशी केली; मात्र ऐवजाचा शोध लागला नाही. त्यानंतर घरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, घरात काम करणारी मोलकरीण शारदा तायडे ही खोलीतून बाहेर येताना पेपरमध्ये पैशांचे बंडल ठेवताना दिसून आली. त्यामुळे चोरी मोलकरणीनेच केल्याचा संशय बळावला. याप्रकरणी रेणू डागा यांच्या तक्रारीवरून नांदुरा पोलिसांनी शारदा अनंता तायडे (रा. नांदुरा) हिच्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस अंमलदार सैय्यद ह. करीत आहेत

# आता निवृत्तीनंतरही कर्मचाऱ्यांना शासकीय घरात राहता येणार

## पाल्याचे शैक्षणिक वर्ष पूर्ण होईपर्यंत दिली जाणार सवलत; पाचपट अनुज्ञप्ती शुल्क आकारले जाणार!

प्रतिनिधी २५ ऑगस्ट

**खामगाव :** सेवानिवृत्तीनंतर शासकीय निवासस्थान रिक्त करण्याच्या नियमांत राज्य शासनाने सवलत दिली आहे. सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्याचा पाल्य इयत्ता पहिली ते बारावीमध्ये शिकत असल्यास आणि त्याचे शैक्षणिक वर्ष जूनमध्ये संपत असल्यास, पाल्याच्या शैक्षणिक वर्षाची सांगता होईपर्यंत संबंधित कर्मचाऱ्याला शासकीय निवासस्थानात वास्तव्य करता येणार आहे. या अतिरिक्त कालावधीसाठी विद्यमान अनुज्ञप्ती शुल्काच्या पाचपट दराने वास्तव्य शुल्क आकारले जाणार आहे. सेवानिवृत्तीनंतर शासकीय निवासस्थान रिक्त करण्याची मुदत संपल्यानंतरही पाल्याच्या शिक्षणाचा विचार करून मर्यादित कालावधीसाठी ही सवलत देण्यात आली आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्षाच्या मध्यात पाल्याचे शिक्षण विस्कळीत होण्याची शक्यता कमी होणार आहे. मात्र, या सवलतीचा लाभ घेण्यासाठी अटींची पूर्तता करणे आवश्यक राहणार आहे.

**निवासस्थान रिकामे होईपर्यंत भत्ता नाही !**

शासकीय निवासस्थानाचा ताबा कायम ठेवलेल्या कालावधीत संबंधित कर्मचाऱ्याला निवासस्थान रिक्त केल्याशिवाय लागू असलेला निवास भत्ता किंवा तत्सम लाभ घेता येणार नाही.

**घर रिकामे न केल्यास नियमानुसार कारवाई**

शासनाने मंजूर केलेली सवलतीची मुदत संपल्यानंतरही निवासस्थान रिक्त न केल्यास संबंधित कर्मचाऱ्यावर प्रचलित नियमांनुसार कारवाई होऊ शकते.



त्यामुळे निर्धारित कालावधीनंतर निवासस्थानाचा ताबा वेळेत देणे आवश्यक राहणार आहे.

**कोणत्या शासकीय निवासस्थानांसाठी नियम लागू?**

शासन निर्णयाच्या कक्षेत येणाऱ्या शासकीय निवासस्थानांसाठी ही सवलत लागू राहणार आहे. संबंधित निवासस्थान कोणत्या विभागाच्या अखत्यारित आहे, त्यानुसार प्रचलित नियम व अटींचे पालन करावे लागणार आहे.

**अर्जासोबत कागदपत्रांची पूर्तता आवश्यक !**

या सवलतीचा लाभ घेण्यासाठी संबंधित कर्मचाऱ्याने नियमानुसार सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज करणे आवश्यक राहणार आहे.

अर्जासोबत पाल्याच्या शाळेतील प्रवेशाची तसेच शैक्षणिक वर्ष जूनमध्ये पूर्ण होत असल्याची माहिती दर्शविणारी आवश्यक कागदपत्रे सादर करावी लागतील.

**परवानगीशिवाय वास्तव्य करता येणार नाही!**

सेवानिवृत्तीनंतर निवासस्थानात अतिरिक्त कालावधीसाठी राहण्याची सवलत ही स्वयंचलितपणे लागू होणार नाही. संबंधित कर्मचाऱ्याने सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहणार आहे. परवानगी मिळाल्यानंतरच शासन निर्णयातील तरतुदीनुसार अतिरिक्त कालावधीचे वास्तव्य करता येईल. त्यामुळे सेवानिवृत्तीपूर्वीच प्रक्रिया पूर्ण करणे कर्मचाऱ्यांसाठी महत्त्वाचे ठरणार आहे.

# भरधाव कारची दुचाकीला धडक; गुन्हा दाखल

प्रतिनिधी २५ ऑगस्ट

**शेगाव :** खामगाव रस्त्यावर भरधाव कारने दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिल्याची घटना २१ ऑगस्ट रोजी सायंकाळी घडली. या अपघातात दुचाकीचे सुमारे पाच हजार रुपयांचे नुकसान झाले असून, दुचाकीस्वार जखमी झाला.

याप्रकरणी २४ ऑगस्ट रोजी शेगाव शहर पोलिस ठाण्यात कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, फिर्यादी अनिल उर्फ आनंदा दगडू थारकर (वय ५२, रा. बोंडगाव, ता. शेगाव) हे आपल्या पुतण्यासह दुचाकीने कामानिमित्त खामगावकडे जात होते. २१ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६:१५ वाजताच्या सुमारास शेगावात एका कपड्याच्या शोरूमसमोर त्यांच्या दुचाकीला पाठीमागून कारने धडक दिली. आरोपी चालक चंद्रकांत निंबाजी जंजाळकर (५२, रा. नाशिक) याने त्याच्या ताब्यातील कार (क्र. एम. एच. १५ जे डब्ल्यू ७२२९) भरधाव व निष्काळजीने चालवून दुचाकीला पाठीमागून धडक दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या अपघातात थारकर जखमी झाले. त्यांच्यावर उपचार करण्यात आले. २३ ऑगस्ट रोजी रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर त्यांनी २४ ऑगस्ट रोजी शेगाव शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीवरून आरोपीविरुद्ध शेगाव शहर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेतील कलम २८१, १२५ (अ), १२५ (ब) व ३२४(४) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस अंमलदार नीलेश गाडगे करीत आहेत.

# भैया... गाड़ी स्टार्ट नहीं हो रही है!

## साध्या पेट्रोल मुळे गाड्यांचे मायलेज घटल्याच्या तसेच इंजिन मध्ये बिघाड होत असल्याच्या वाढल्या तक्रारी

प्रतिनिधी २५ ऑगस्ट

**अकोला:** जेव्हापासून सरकारने पेट्रोलमध्ये इथेनॉल मिक्स करण्याचा निर्णय घेतला आहे केव्हापासून इथेनॉल मिश्रित पेट्रोल विरुद्ध तक्रारी वाढत चालले आहेत साध्या पेट्रोल वर चालणाऱ्या वाहनांच्या मायलेजमध्ये दर लिटर मागे चार ते सात किलोमीटर ची घट झाल्याचा दावा केला जात आहे त्याचबरोबर इंजिन मध्ये पाणी साचणे पिकअप कमी होणे आणि स्पार्क प्लग वारंवार खराब होणे याशिवाय पावसाळ्यात किंवा दीर्घकाळ गाडी उभी राहिल्यास फ्युएल फिल्टर मध्ये कचरा जमा होऊन गाडी अचानक बंद पडणे अशा तक्रारी वाढल्या आहेत. त्यामुळे अनेक वाहनधारक आता स्पीड पॉवर आणि हायऑक्टेन अशा प्रीमियम पेट्रोल ला पसंती देत आहेत त्यामुळे शहरात साध्या पेट्रोलची विक्री कमी आणि प्रीमियम पेट्रोलच्या विक्रीत 15 ते 20 टक्के वाढ झाल्याची बाब खाजगी मध्ये पेट्रोल पंप चालक व्यक्त करीत आहेत.



### साध्या पेट्रोल ऐवजी प्रीमियम पेट्रोलला पसंती का?

» प्रीमियम पेट्रोलमध्ये कार्बन साफ करणारे विशेष घटक असतात साध्या पेट्रोलमध्ये 15 ते 20 टक्के इथेनॉलचे मिश्रण असते साध्या पेट्रोल मुळे मायलेज कमी व इंजिन मध्ये गाळ साचण्याची शक्यता असते तर दुसरीकडे प्रीमियम पेट्रोल इंजिन आतून स्वच्छ व सुरक्षित ठेवते तसेच इंधनाचे पूर्ण ज्वलन होत असल्याने इंजिनची कार्यक्षमता आणि मायलेज सुधारते तसेच गाडीचा पिकअप वाढतो आणि इंजिनचा आवाज खूप कमी येतो. त्यामुळे आता अनेक वाहनचालक महाग असले तरी प्रीमियम पेट्रोललाच पसंती देत आहेत

### साध्या पेट्रोल मुळे मेकॅनिक लोकांना आले अच्छे दिन

» सध्या साध्या पेट्रोल मुळे वाहन सुरू होत नसल्याने व अचानक रस्त्यात वाहन बंद पडल्याच्या तक्रारी घेऊन येणाऱ्या वाहनचालकांच्या गर्दीमुळे शहरातील जवळजवळ सर्वच मेकॅनिक लोकांचे अच्छे दिन आल्याचे पहावयास मिळत आहे प्रत्येक गॅरेज समोर रोज दहा ते पंधरा गाडी मालक ह्याच तक्रारी घेऊन आपल्या गाड्या घेऊन येत असल्याचे चित्र प्रत्येक गॅरेज समोर दिसून येत आहे

# जिल्हा स्त्री रुग्णालयातील दुर्घटनेच्या चौकशीसाठी सात सदस्यीय समिती गठीत

प्रतिनिधी २५ ऑगस्ट

**अमरावती** : जिल्हा स्त्री रुग्णालयातील अतिदक्षता विभागात आग लागून 3 नवजात बालके मृत्युमुखी पडल्याची घटना अत्यंत दुर्दैवी आहे. या घटनेच्या चौकशीसाठी सात सदस्यीय चौकशी समिती नेमण्यात आली आहे. येत्या आठ दिवसात ही समिती अहवाल सादर करणार आहे. यात दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, कोणाचीही गय केली जाणार नाही, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी येथे दिली. जिल्हा स्त्री रुग्णालयातील दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर आरोग्य मंत्री श्री. आबिटकर यांनी दुर्घटना घडलेल्या एनआयसीयूला भेट देऊन पाहणी केली. यावेळी आमदार सुलभा खोडके, महापौर श्री. चंद तेजवानी, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, विभागीय आयुक्त नयना गुंडे, आरोग्य विभागाचे संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, जिल्हाधिकारी आशिष येरेकर उपस्थित होते. आरोग्यमंत्री श्री. आबिटकर म्हणाले, आज प्रत्यक्ष घटनास्थळाची पाहणी केली आहे.



यातून घटनेची भीषणता दिसून आली. ही अतिशय दुर्दैवी घटना आहे. दोन वर्षांपूर्वीच हे नवीन रुग्णालय सुरू करण्यात आले. तेथे संपूर्ण अद्ययावत सोयीसुविधा कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे अशा प्रकारची घटना घडायलाच नको होती. या घटनेचे नेमके कारण शोधून यापुढे अशी घटना घडू नये यासाठी आवश्यक उपाययोजना सुचविण्यासाठी आरोग्य विभागाचे आयुक्त संजय काटकर यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती नेमण्यात आली आहे. या समितीत महाराष्ट्र विद्युत महामंडळाचे मुख्य अभियंते, एम्सचे वरिष्ठ अधिकारी, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाचे वरिष्ठ अधिकारी यांचा समावेश असणार आहे. येत्या आठ दिवसात घटनेचा सखोल तपास करून प्रत्यक्ष जबाबदार असलेल्याविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल. ही समिती समस्येच्या खोलवर जाऊन कारणे शोधणार आहे. व्हेंटिलेटर, वीज यंत्रणेतील दोष, फायर ऑडिट, तसेच अन्य अनियमितता यांची सखोल तपासणी करेल. या दुर्दैवी घटनेतून यंत्रणेलाही शिकावे लागेल. ज्या त्रुट्या आढळून येतील त्या दुरुस्त करण्यासाठी शासन संपूर्ण प्रयत्न करेल. तसेच या घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या नवजात बालकांच्या पालकांना शासनातर्फे पाच लाख रूपये आर्थिक मदत देण्यात येईल. तसेच जखमी बालकांवर उपचाराचा खर्च शासनाकडून करण्यात येईल. आजच्या घटनेने गांभीर्य लक्षात घेऊन शासकीय तसेच खासगी रुग्णालयातील फायर ऑडिट नियमानुसार व नियमीत होण्यासाठी मुंबई येथे मंत्रालयात संबंधित यंत्रणांच्या प्रमुखांशी चर्चा करण्यात येईल. तसेच आवश्यक सूचना सर्व रुग्णालयांना देण्यात येतील, असेही त्यांनी यावेळी सांगितले. दरम्यान आरोग्य मंत्री श्री. आबिटकर यांनी डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयाला भेट देऊन उपचार घेत असलेल्या दुर्घटनेतील नवजात बालकांच्या प्रकृतीची माहिती घेतली.

# अकोल्यात भक्तिधाम मंडळाच्या वतीने कावड आरतीचा सन्मान

प्रतिनिधी २५ ऑगस्ट

**अकोला** : अकोल्यातील नगर परिषद कॉलनीत सध्या श्रावण महिन्याचा अभूतपूर्व उत्साह पाहायला मिळतोय. भक्तिधाम शिवभक्त मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य श्रावण कावड आरती सोहळ्याचं 'हर हर महादेव' आणि 'बम बम भोले'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर अक्षरशः शिवमय झाला होता. नगर परिषद कॉलनी येथे भक्तिधाम शिवभक्त मंडळाच्या वतीने आयोजित पवित्र श्रावण कावड आरती सोहळ्यात सुनील



इन्नाणी आणि त्यांची पत्नी माधुरी यांच्यासह सन्मान स्वीकारताना महादेवाच्या भक्तीने आणि 'हर हर महादेव'च्या गजराने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. यावेळी स्वानंद कोंडोलीकर, कपिलेश सरोदे, आयुष पांडे, रमण तळणीकर, समीर पत्की, आदित्य भोजने यांच्यासह हरिषभाई अलिमचंदाणी, विजय इंगळे आणि राजेश भारती या सर्व मान्यवरांचे व शिवभक्तांची उपस्थिती होती. श्रावणाच्या या पवित्र वातावरणात 'हर हर महादेव'च्या घोषाने भाविक मंत्रमुग्ध झाले.

# खटकाली डोहात बुडून दोन विद्यार्थ्यांचा दुर्दैवी मृत्यू; अकोट शहरावर शोककळा

वि. प्रतिनिधी २५ ऑगस्ट

**अकोट** : खटकाली येथील डोहात बुडून अकोट येथील दोन अल्पवयीन विद्यार्थ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना सोमवारी दुपारी घडली. या घटनेमुळे अकोट शहरासह संपूर्ण परिसरात शोककळा पसरली.

येथील काही विद्यार्थी सोमवारी सातपुडा परिसरातील जंगल व निसर्गरम्य स्थळांना भेट देण्यासाठी गेले होते. यावेळी विद्यार्थी चिखलदरा तालुक्यातील खटकाली डोह परिसरात पोहोचले. परिसरातील निसर्गसौंदर्याचा आनंद घेत असताना काही विद्यार्थी डोहाजवळ गेले. मात्र, पाण्याची खोली व प्रवाहाचा अचूक अंदाज न आल्याने इयत्ता अकरावीमध्ये शिक्षण घेत असलेले कृष्णा झांबरे (१६) आणि गिरीधर दाभाडे (१६) हे दोघेही पाण्यात बुडाले. उपस्थित विद्यार्थ्यांनी व



स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेतली. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच एकलव्य आपात्कालीन बचाव पथकाचे प्रमुख पांडुरंग तायडे तसेच त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. रुग्णसेवक संजय शळके यांनीही मदतकार्यात सहभाग घेतला. बचाव पथकाने प्रयत्न करून दोन्ही विद्यार्थ्यांचा शोध घेतला. मात्र, दुर्दैवाने त्यांना वाचविण्यात यश आले नाही. काही वेळाने दोन्ही विद्यार्थ्यांचे मृतदेह डोहातून बाहेर काढण्यात आले. त्यानंतर पंचनामा व इतर आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून मृतदेह अकोट ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले.

# अकोल्यात राखीच्या दरात 30 ते 40 टक्क्यांची वाढ

## दरवाढ आणि बदललेल्या वेळेमुळे ग्राहकांची बाजाराकडे पाठ

प्रतिनिधी २५ ऑगस्ट

**अकोला** : रक्षाबंधनाचा सण अवघ्या काही दिवसांवर आला असताना अकोला शहरातील राखी बाजारात मात्र अपेक्षित गर्दी दिसत नाहीये. यंदा राखीच्या दरात तब्बल ३० ते ४० टक्क्यांची वाढ झाली आहे. त्यातच राखी बांधण्याच्या मुहूर्ताची वेळ बदलल्याने खरेदीवरही परिणाम झाल्याचे चित्र आहे. रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर अकोला शहरातील बाजारपेठा सजल्या आहेत. विविध प्रकारच्या आकर्षक राख्या बाजारात दाखल झाल्या असल्या, तरी यंदा राखी खरेदीला अपेक्षित प्रतिसाद मिळताना दिसत नाही.यंदा राखीच्या दरात जवळपास ३० ते ४० टक्क्यांची वाढ झाल्याने ग्राहकांच्या खिशावर अतिरिक्त भार पडला आहे. त्यातच राखी बांधण्याच्या मुहूर्ताची वेळ वेगळी



असल्याने ग्राहकांना खरेदीसाठी कमी वेळ मिळत असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. दरवाढीचा परिणाम थेट राखीच्या विक्रीवर होत असून, बाजारात ग्राहकांची गर्दी कमी असल्याचे चित्र आहे.सणाचा उत्साह कायम असला, तरी वाढलेल्या किमतींमुळे ग्राहकांचा खरेदीचा उत्साह काहीसा कमी झाल्याचे दिसून येत आहे.आता रक्षाबंधनाच्या मुहूर्ताला आणि सणाच्या दिवसांत राखी बाजारात गर्दी वाढते का, याकडे व्यापाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# कामाख्यादेवीच्या धर्तीवर अकोल्यात प्रथमच निघाली अग्निकलश यात्रा



प्रतिनिधी २५ ऑगस्ट

अकोला : श्री राजराजेश्वर नगरीत कामाख्यादेवीच्या धर्तीवर प्रथमच श्रावण शुक्लपक्ष द्वादशी तिथी तसेच श्रावणातील दुसऱ्या सोमवारी भव्य अग्निकलश यात्रेचे आयोजन करण्यात आले. सोमवारी सायंकाळी ६ वाजता जुन्या शहरातील हरिहर पेठ येथील प्राचीन हरिहर मंदिरातून या यात्रेला सुरुवात झाली. प्राचीन हरिहर मंदिरातून निघालेल्या या भव्य शोभायात्रेत अकोला शहरासह परिसरातील शेकडो शिवभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. भक्तिमय वातावरणात निघालेल्या यात्रेत भाविकांनी हर हर महादेवचा जयघोष करीत सहभाग नोंदविला. विविध धार्मिक विधी व भक्तिमय वातावरणामुळे परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते. ही अग्निकलश यात्रा श्रीमद्देवीभागवत महापुराणाचे कथाव्यास तथा शाक्त शारवी परंपरेचे प्रमुख धर्माचार्य श्री चेतन महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली व नेतृत्वात काढण्यात आली. प्राचीन हरिहर मंदिरातून निघालेल्या यात्रेचा समारोप श्री राजराजेश्वर मंदिर येथे करण्यात आला. यात्रेदरम्यान शिवभक्तांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

# ग्रामसेवकांचा संप, नागरिकांच्या समस्यांना वाली कोण?

## ग्रामसेवकांचा संप; ग्रामीण भागातील कामकाज ठप्प

प्रतिनिधी २५ ऑगस्ट

**अकोला** : अकोला जिल्ह्यात ग्रामसेवकांचा संप सुरू असल्याने ग्रामीण भागातील प्रशासकीय कामकाजावर परिणाम झाला आहे. गावातील समस्या आणि तक्रारी घेऊन नागरिक आता जिल्हा परिषदेकडे धाव घेत आहेत. मात्र, तक्रारी घेऊन आलेल्या नागरिकांनाच मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या दालनाबाहेर बराच वेळ ताटकळत उभे राहावे लागत असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

अकोला जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये ग्रामसेवकांचा संप सुरू असल्याने ग्रामपंचायतींच्या दैनंदिन कामकाजावर मोठा परिणाम होत आहे. गावातील विविध समस्या, ग्रामसभा आणि प्रशासकीय कामांबाबत नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.ग्रामपंचायतीकडून प्रश्न सुटत नसल्याने अनेक गावांतील नागरिक आता आपल्या तक्रारी घेऊन जिल्हा परिषद प्रशासनाकडे धाव घेत आहेत. ग्रामीण भागातील समस्या मांडण्यासाठी तसेच ग्रामसभा घेण्याबाबत पाठपुरावा करण्यासाठी नागरिक जिल्हा परिषदेत दाखल झाले. मात्र, जिल्हा परिषदेत आल्यानंतरही नागरिकांची गैरसोय थांबली नाही. तक्रारी घेऊन आलेल्या नागरिकांना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या दालनाबाहेर बराच वेळ प्रतीक्षा करावी लागल्याचे पाहायला मिळाले. अधिकारी बैठकीत व्यस्त असल्याने नागरिकांना भेटीसाठी ताटकळत राहावे लागले.ग्रामीण भागातून अनेक किलोमीटरचा प्रवास करून नागरिक आपल्या समस्या घेऊन जिल्हा परिषदेत येतात.

मात्र, अधिकाऱ्यांची भेट न झाल्यास त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही खर्ची पडतात. काही नागरिकांना बराच वेळ प्रतीक्षा करूनही भेट न झाल्याने नाराजी व्यक्त करावी लागली. एकीकडे ग्रामसेवकांचा संप, दुसरीकडे गावकऱ्यांच्या समस्या आणि त्यावर तोडगा काढण्यासाठी प्रशासनाच्या दारात येऊनही प्रतीक्षाच... त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांच्या प्रश्नांकडे प्रशासन गांभीर्याने कधी पाहणार, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

# अकोलेकरांवर पुन्हा जलसंकटाची टांगती तलवार!

प्रतिनिधी २५ ऑगस्ट

**अकोला** : अकोला शहरावर पुन्हा एकदा जलसंकटाची टांगती तलवार आहे. महापालिकेकडून पाणीपुरवठ्याचे अंतर वाढवण्याची शक्यता व्यक्त होत असून, सातव्या दिवशीही पाणी मिळाले नाही तर अकोलेकरांचा संयम सुटण्याची शक्यता आहे. त्यामुळे पाणीपुरवठ्याच्या नियोजनावर आता प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. अकोला शहरातील पाणीप्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पाणीसाठा आणि वाढती मागणी यामुळे महापालिकेच्या पाणीपुरवठ्याच्या नियोजनावर ताण निर्माण झाला असून, सातव्या दिवशी पाणीपुरवठा करण्याची वेळ येऊ शकते, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

पाणीपुरवठा आणखी लांबला तर सर्वसामान्य नागरिकांसमोर मोठे संकट उभे राहणार आहे. पिण्याच्या पाण्यासह घरगुती वापरासाठीही नागरिकांना टँकरवर अवलंबून राहावे लागू शकते.आता सवाल एकच अकोलेकरांना वेळेवर आणि पुरेसं पाणी मिळणार तरी कधी ?. पाणीटंचाई आणखी गंभीर होण्यापूर्वी महापालिका प्रशासन ठोस नियोजन करणार का, की नागरिकांना घागर घेऊन रस्त्यावर उतरण्याची वेळ आल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार ?

# आर डी.जी. पब्लिक स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शनाचे यशस्वी आयोजन

## बालवैज्ञानिकांच्या आकर्षक मॉडेल्सनी वेधले सर्वांचे लक्ष

प्रतिनिधी २५ ऑगस्ट

अकोला : आर.डी.जी. पब्लिक स्कूलमध्ये २२ ऑगस्ट रोजी सकाळी १०.०० वाजता विज्ञान प्रदर्शनाचे भव्य व उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. यावेळी शाळेचे सभागृह विद्यार्थ्यांची जिज्ञासा आणि त्यांच्या सर्जनशील प्रतिभेने भारून गेले होते. या कार्यक्रमास शाळेचे संचालक दिलीपराजजी गोयनका , प्रमुख पाहुणे प्रा. नितीन ओक , प्राचार्य कुरियचन सी.पी, उपप्राचार्या श्वेता चोमवाल तसेच मुख्य समन्वयक गुरनीत कौर ओबेरॉय आणि परीक्षकगण यांची विशेष उपस्थिती लाभली.




मान्यवरांच्या शुभहस्ते सरस्वती पूजन व भारतरत्न वैज्ञानिक सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर प्रमुख पाहुणे प्रा. नितीन ओक तसेच परीक्षकांचे रोपटे आणि ज्ञानवर्धक पुस्तक देऊन स्वागत करण्यात आले. विज्ञान प्रदर्शनासाठी डॉ. संजय देवडे, डॉ. हरीश मालपानी आणि डॉ. स्वाती झोडपे यांनी परीक्षक म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांचे परीक्षण केले.

मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वैज्ञानिक दृष्टिकोन, जिज्ञासू वृत्तिची प्रशंसा केली. विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट प्रतिभेने अनेक आकर्षक व उपयुक्त वैज्ञानिक मॉडेल्स सादर केले. यामध्ये हायड्रो इलेक्ट्रिसिटी, मिनी हेलिकॉप्टर, बझी गेम, ड्रोन, स्केलेटन सिस्टम, अर्थक्वेक अलार्म सिस्टम, फिमेल रिप्रोडक्टिव सिस्टम, ओशन अँड सी क्लिनिंग बोट, आदित्य एल-१, हायड्रॉलिक ब्रिज, स्मार्ट क्रॉप प्रोटेक्शन सिस्टम, प्रिव्हेंटिंग ट्रेन ॲक्सिडेंट, न्यूटन पेंडुलम, फार्म एक्स रोबो, प्लाझ्मा गन, बॉर्डर सिक्युरिटी सिस्टम आणि स्मार्ट इरिगेशन सिस्टम या मॉडेल्सनी विशेष लक्ष वेधून घेतले. प्रा. नितीन ओक तसेच अन्य मान्यवर अतिथी आणि परीक्षकांनी सर्व वैज्ञानिक मॉडेल्सची पाहणी केली. यावेळी आपले विचार व्यक्त करताना प्रा. नितीन ओक म्हणाले की,विद्यार्थ्यांनी तसेच आपण सर्वांनी कृत्रिम बुद्धिमत्तेवर अर्थात ए.आय.वर पूर्णपणे अवलंबून न राहता स्वतःच्या बुद्धिमत्तेचा आणि विचारशक्तीचा योग्य वापर करावा. प्राचार्य कुरियचन सी.पी. यांनीही आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांच्या परिश्रमाचे आणि त्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचे कौतुक केले. या विज्ञान प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांच्या पालकांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. पालकांनी आपल्या पाल्यांच्या वैज्ञानिक प्रयत्नांचे आणि सर्जनशील कार्याचे कौतुक करत विद्यालयाने आयोजित केलेल्या या उपक्रमाची प्रशंसा केली. कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन विद्यार्थिनी लावण्या धावले आणि महक कटारिया हीने केले. विज्ञान विभाग प्रमुख शिक्षिका दुर्गा पाठक यांनी आभार प्रदर्शन केले. विज्ञान विभाग प्रमुख शिक्षिका दुर्गा पाठक यांच्यासह मंदार जोशी, मीनल कडू, जय पाटणे, श्रद्धा गिरी, सोनल पसारी, प्रांजली देशमुख, रीना गुप्ता तसेच क्रीडा शिक्षक पंकज कोकाटे, भूषण पाटील यांनी प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले.प्राचार्य कुरियचन सी.पी. आणि उपप्राचार्या श्रीमती श्वेता चोमवाल यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वी झाला.

# दहिहंडाच्या श्री रुपनाथ महाराज संस्थानला 'ब' वर्ग दर्जा प्राप्त

## खासदार अनुप धोत्रे व आमदार रणधीर सावरकरांच्या प्रयत्नांना यश

प्रतिनिधी २५ ऑगस्ट

अकोला : श्री रुपनाथ महाराज संस्थान दहिहंडाला शासनाकडून 'ब' वर्ग दर्जा प्रदान करण्यात आला आहे. खासदार अनुप धोत्रे व आमदार रणधीर सावरकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे व जिल्ह्याचे पालकमंत्री आकाश फुंडकर यांच्याकडे पाठपुरावा करून या संस्थानास ब वर्ग दर्जा देण्याची आग्रही मागणी केली होती.

त्यांच्या मागणीला यश येऊन 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रा स्थळ योजना (ब वर्ग)' अंतर्गत श्री रुपनाथ महाराज संस्थानास ब वर्ग दर्जा देण्यात आला आहे. यापूर्वीच आमदार रणधीर सावरकर यांच्या प्रयत्नातून या संस्थानाच्या विकासासाठी तीर्थक्षेत्र पर्यटन विकास योजनेंतर्गत २.५० कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून, भाविकांसाठी मूलभूत सोयी-सुविधांची ९०% कामे पूर्ण झाली आहेत. आता ब वर्ग दर्जा मिळाल्याने संस्थानचा विस्तारित विकास आणि अद्ययावत सोयी-सुविधांसाठी अतिरिक्त निधी उपलब्ध होणार आहे. आमदार सावरकर म्हणाले, "धर्म, संस्कृती, संस्कार आणि विकास या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. अकोला पूर्व मतदारसंघातील ६ तीर्थस्थळांना महत्त्व प्राप्त करून देत ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्यासोबत परंपरा जतन करण्याचा आमचा संकल्प आहे. माजी मंत्री संजयभाऊ धोत्रे, माजी मंत्री गोवर्धन शर्मा व भाऊसाहेब फुंडकर यांच्या कर्मभूमीला प्राधान्य देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री आकाश फुंडकर यांच्या सहकार्याने विकासाचा रथ आम्ही पुढे नेत आहोत."


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.

■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135